
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ११०
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

खालापुरात लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार/२
मंत्री गणेश नाईक ठाण्याचे निवडणूक प्रमुख/६
चौथ्या टी-२०मध्ये भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय/८

## लोकलच्या धडकेत दोन प्रवाशांचा मृत्यू, दोघे जखमी



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर गुरुवारी (दि.६) अचानक रेल्वे कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारले. त्यामुळे लोकल ट्रेनचे वेळापत्रक कोलमडले. इतकेच नाही, तर लोकल गाड्या उशिरा सुरू झाल्याने सीएसएमटी आणि इतर सगळ्याच मोठ्या स्टेशनवर प्रचंड गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. यादरम्यान रूळावरून चाललेल्या चार प्रवाशांना अंबरनाथ फास्ट लोकलने धडक दिली. यात दोन जणांचा मृत्यू झाला असून दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वेस्थानकांदरम्यान ही घटना घडली. काही महिन्यांपूर्वी मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ झालेल्या अपघातप्रकरणी रेल्वे पोलिसांनी दोन अभियंत्यावर गुन्हा दाखल केला. याच्या निषेधार्थ रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता आंदोलन केले. त्याचा फटका प्रवाशांना बसला.

# वंदे मातरम् @ १५० वर्ष

## नवीन पनवेलमध्ये आज गीताचे समूह गायन

### राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती

### अभिनेते आणि व्याख्याते शरद पोंक्षे करणार विवेचन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशप्रेमाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या वंदे मातरम् या स्फूर्तिदायी गीताच्या १५०व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नवीन पनवेलमधील के.आ. बांठिया विद्यालय येथे शुक्रवारी (दि. ७) सायंकाळी ४ वाजता वंदे मातरम् समूह गायन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आल्याची माहिती कार्यक्रम प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी अभिनेते व प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितीत राहून वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी व महत्त्व यावर मार्गदर्शन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी १८७५ साली रचलेल्या वंदे मातरम् या गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण आहेत. या पार्श्वभूमीवर हा विशेष कार्यक्रम होत आहे. या संदर्भात पनवेल मार्केट यार्ड येथे झालेल्या पत्रकार परिषदेला कार्यक्रम प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, यतीन पाटील आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाच्या संदर्भात माहिती देताना पुढे सांगितले की, भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने वंदे मातरम् गीताच्या १५० वर्षांच्या उल्लेखनीय परंपरेचा उत्सव राष्ट्रीयस्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे भाजपच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप कार्यकर्ते आणि लोकसहभागातून हा उत्सव व्यापक प्रमाणात साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने भाजप देशभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक वंदे मातरम् गायन, देशभक्तीपर रॅली तसेच जनजागृती उपक्रमांचे आयोजन करणार आहे. हे सर्व कार्यक्रम आगामी संविधान दिन (२६ नोव्हेंबर)पर्यंत चालणार आहेत. **(पान २ वर..)**

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर भाजप रायगड निवडणूक प्रभारीपदाची जबाबदारी!

### लोकनेते रामशेठ ठाकूर उत्तर रायगडचे निवडणूक प्रमुख

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या असून सर्वात आधी नगरपालिकांसाठी पुढील महिन्यात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर रायगडचे निवडणूक प्रमुख म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची आणि संपूर्ण रायगड जिल्ह्याचे निवडणूक प्रभारी म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची भाजपने नियुक्ती केली आहे. निवडणूक व्यवस्थापनामध्ये त्यांचा हातखंडा असल्याने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ही जबाबदारी सोपवली आहे.

कोरोना आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या, परंतु येत्या जानेवारी महिन्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यानुसार मंगळवारी महाराष्ट्र निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन नगर परिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, मुरूड-जंजिरा, पेण, उरण, कर्जत, माथेरान, रोहा, श्रीवर्धन व महाड या नगर परिषदांसाठी मतदान होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि पनवेल महानगरपालिकेची रणधुमाळी होणार आहे.




*आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाकडून रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी सोपवल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांचे मनःपूर्वक आभार! पक्षाच्या विचारसरणीला अधिक बळकटी देत रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचा झेंडा अधिक उंच नेण्यासाठी मी पूर्ण ताकदीनिशी कार्य करणार असल्याचे आश्वस्त करतो.*

**-आमदार प्रशांत ठाकूर**

दरम्यान, मोठ्या प्रमाणात राजकीय स्थित्यंतरे झाल्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांच्या आशा पल्लवी झाल्या आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्ष आघाडीवर आहे. या पक्षाची सर्वच तालुक्यांमध्ये ताकद वाढलेली आहे. विद्यमान प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे रायगडचे पालकमंत्रिपद होते. त्यामुळे या जिल्ह्यावर त्यांचे विशेष लक्ष आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला चांगले यश मिळावे या उद्देशाने त्यांनी आपले अत्यंत विश्वासू सहकारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर जिल्हा प्रभारीपदाची जबाबदारी सोपवली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सन २००४पासून निवडणूक व्यवस्थापनाचा मोठा अनुभव आहे. मायक्रो प्लॅनिंगमध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्याचबरोबर त्यांनी भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम केले असून नेतृत्वाची चुणूक दाखवून दिली. पक्ष संघटना वाढीच्या दृष्टिकोनातून त्यांची कामगिरी उजवी ठरली. त्यांच्या कार्यकाळात भाजप रायगडमध्ये विस्तारला गेला. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जिल्हा प्रभारी म्हणून प्रदेशाध्यक्षांनी निवड केली आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### ईडीकडून सुरेश रैना आणि शिखर धवनची ११.१४ कोटींची संपत्ती जप्त

**नवी दिल्ली :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) पीएमएलए कायद्यातील तरतुदींनुसार माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांची ११.१४ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. यामध्ये रैनाच्या नावावर असलेली ६.६४ कोटी रुपयांची म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि धवनच्या नावावर असलेल्या ४.५ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा समावेश आहे.

### गोव्यात दुकानांवर पाकिस्तान झिंदाबादचे नारे, मालकांना अटक

**कळंगुट :** उत्तर गोव्यातील बीच बेल्टवरील दोन दुकानांच्या एलईडी फलकांवर पाकिस्तान झिंदाबाद असे नारे झळकले. या प्रकरणी मालकांना पोलिसांनी अटक केली आहे. या वेळी काही काळ तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, या फलकांवर जाणुनबूजून असे केले गेले की ते हॅक झाले याचा तपास पोलीस करीत आहेत.

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

## रायगडात नवउद्यमींना कर्जाचे वितरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग व्यवसाय सुरू करण्याकरिता असलेल्या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत रायगड जिल्ह्यात या वर्षी २८५ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी १७७ प्रकरणांत कर्ज वितरण करण्यात आले असून नवउद्यमींच्या रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

रोजगार निर्मितीला चालना मिळावी यासाठी नवउद्योगांना चालना देण्याचे धोरण राज्य सरकारने आखले आहे. होतकरू तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी मिळाव्यात हा यामागचा उद्देश आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील नवउद्यमींना यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत ५० लाख रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. राज्याच्या उद्योग विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. लघु आणि कुटीर उद्योगांना चालना देणे आणि त्यातून रोजगार निमिर्ती व्हावी यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्राम उद्योग आणि बँकांना नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. जिल्ह्यासाठी गेल्या आर्थिक वर्षात रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत ७४४ प्रकरणांना मंजुरी देण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्या तुलनेत ७५४ प्रस्तावांना मंजुरी देऊन कर्जपुरवठा करण्यात आला होता. जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. इ. बँकानी कर्जपुरवठ्याला चांगला प्रतिसाद दिला, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या यांनी दिली. यंदाचे उद्दिष्टही जिल्हा पूर्ण करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

### १६०० उद्योग निर्मितीचे उद्दिष्ट

*रायगड जिल्ह्यात या योजनेसाठी या वर्षी एक हजार ६०० लघु आणि कुटीर उद्योग निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ऑनलाईन पद्धतीने एक हजार ४०० नवउद्यमींनी योजनेंतर्गत प्रस्ताव दाखल केले आहेत. यापैकी एक हजार २०० प्रस्ताव मंजुरीसाठी बँकाकडे पाठविण्यात आले आहेत. त्यातील १७७ जणांना कर्जवाटप करण्यात आले असून २८५ जणांची कर्जप्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. ७०० प्रकरणे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. या प्रस्तावांना चालू महिन्याअखेर मंजुरी मिळण्याची शक्यता आहे.*

## बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६०.१३ टक्के मतदान

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील १८ जिल्ह्यांच्या १२१ मतदारसंघामध्ये गुरुवारी (दि. ६) मतदान झाले. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६०.१३ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

पहिल्या टप्प्यात एकूण एक हजार ३१४ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये पहिल्या टप्प्यात सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा या दोन उपमुख्यमंत्र्यांसह १८ मंत्र्यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे विरोधी पक्षाच्या आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तेजस्वी यादव, लालूप्रसाद यादव यांचे ज्येष्ठ पुत्र तेजप्रताप यादव यांचीदेखील प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

## रोह्यातील बाहे गावाजवळ बिबट्याचा वावर; वनविभाग सतर्क

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील बाहे गावाजवळ नागरिक दैनंदिन काम आटपून घराकडे परतत असताना त्यांना बिबट्या दिसला. बिबट्याच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

बाहे येथील मंदार साळवी व निवीचे बाबू जाधव यांनी रात्री बिबट्या दिसल्याचे पोलीस पाटील मनोज तुकाराम थिटे यांना सांगितले. थिटे यांनी वनविभागाशी संपर्क साधल्यानंतर खांब येथून वनरक्षक अक्षय लाटे व अंकिता भगत यांनी रात्री ग्रामस्थांसोबत बिबट्या दिसल्याच्या ठिकाणी पाहणी केली. अधिकाऱ्यांनी या पावलांचे ठसे तपासले तसेच प्रत्यक्षदर्शींकडून माहिती घेतली.

बिबट्याचे ठसे गावाच्या वेशीजवळ तसेच शेताच्या कडेला आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाकडून पुढील काही दिवस गाव परिसरात गस्त घालण्याचे नियोजन करण्यात आले असून नागरिकांनी अफवा न पसरवता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन रोहा वनपरिक्षेत्र अधिकारी दबडे यांनी केले आहे. **(सविस्तर पान ५ वर..)**

## ‘माथेरानच्या राणी’ची शीळ गुंजली

### मिनीट्रेन अखेर पर्यटकांच्या सेवेत हजर



**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

सर्वांनाच आतुरता असलेली माथेरानची राणी अर्थातच मिनीट्रेनने गुरुवारी (दि.६) मोठ्या दिमाखात माथेरान रेल्वेस्थानकात पुनरागमन केले. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मे महिन्यापासून नेरळ-माथेरान मिनीट्रेन बंद होती. त्यानंतर अडचणींवर मात करीत अखेर पहिली ट्रेन गुरुवारी नेरळ स्थानकातून सकाळी ८.५५ वा. सुटली आणि माथेरान स्थानकात ११.३५ वा. पोहचली. एकूण ७६ प्रवाशांनी या पहिल्या ट्रेनमधून प्रवास केला. या ट्रेनमध्ये ४०७ एनडीएम १ एचपी इंजिन लावण्यात आले असून एक विस्ता डोम कोच अधिक एक जनरेटर कोच लावून ही ट्रेन चालविण्यात आली.

या गाडीचे सारथ्य लोको पायलट (इंजिन ड्रायव्हर) हरीश चिंचोले, मुकेश योगी यांनी केले, तर गार्ड म्हणून एच.डी. मीना यांनी काम पाहिले. माथेरान स्थानकात महाराणीच्या स्वागतासाठी नागरिकांसह पर्यटकांनी गर्दी केली होती. या ट्रेनच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात यावी, जेणेकरून सर्व पर्यटकांना याचा आनंद घेता येईल, अशी मागणी होत आहे.

## महाराष्ट्रात थंडीची चाहूल!

**पुणे : प्रतिनिधी**



महाराष्ट्रात पावसाचा जोर हळूहळू कमी होत आहे. कमाल तापमानाचा पारा ३० अंशांच्या वर असून किमान तापमानाचा पारा २० अंशांच्या खाली येऊ लागला आहे. अशात थंडीची चाहूल लागली आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून अधूनमधून सुरू असलेल्या पावसानंतर अखेर मुंबईसह, विदर्भ मराठवाड्यात थंडीचा मौसम तयार होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवसात किमान तापमान दोन ते चार अंशांनी घसरण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बंगालच्या उपसागरावर गुंगावणाऱ्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती धूसर होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात आता हवामान कोरडे होण्यास सुरुवात होणार आहे. पुढील २४ तासांत महाराष्ट्रात किमान तापमान दोन ते तीन अंशांनी घटणार असून पाऊस रजा घेणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून मुंबई उपनगरासह कोकणपट्टी व दक्षिण मध्य महाराष्ट्राला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले. हवेत आर्द्रता व ओलावा कायम होता. दरम्यान, ७ नोव्हेंबरपासून हवामान शुष्क होत जाणार असून पुढील दोन दिवसात तापमानात घट होण्याची शक्यता आहे.



# वंदे मातरम् गीताला १५० वर्ष पूर्ण

**मंत्रालयात आज निनादणार समूहगान**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सार्ध शताब्दी महोत्सवास होणार सुरुवात

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' गीताला १५० वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता 'वंदे मातरम्' चे समूहगान होणार आहे. 'सार्ध शताब्दी' महोत्सवाच्या माध्यमातून पुढील वर्षभर राज्यभरात कौशल्य विकास विभागाच्यावतीने विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली



रचलेल्या 'वंदे मातरम' या गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण होत असल्याने मंत्री लोढा यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम होणार आहेत. तसेच, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीनेही राज्यभरात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

यासंदर्भात मंत्री लोढा म्हणाले की, ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या वंदे मातरम गीतामध्ये देशप्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. स्वातंत्र्य लढ्यातील शहिदांना अभिवादन आणि मातृभूमीला वंदन करणारे संस्कार या गीताच्या समूह गायनातून होणार असल्याने शासकीय स्तरावरून शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्ये 'वंदे मातरम्' गीताचे समूहगान आयोजित करण्याबाबत परिपत्रक आणि अध्यादेश जारी करण्यात आले आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही यासंदर्भात देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागानेही राज्यस्तरीय तसेच तालुका स्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. राज्यभरात निबंध लेखन, परिसंवाद, प्रदर्शने आणि वक्तृत्व स्पर्धा असे कार्यक्रम होणार आहेत.

विविध सामाजिक संघटना, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तसेच समाज माध्यमांवर या ऐतिहासिक सोहळ्याला व्यापक रूप देण्याचा प्रयत्न आहे.

# खालापुरात लग्नाच्या आमिषाने अत्याचार, आरोपी अटकेत

**खोपोली : प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीचा शारीरिक उपभोग घेऊन ती गर्भवती झाल्यावर लग्न न करता जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अभिजीत काळूराम पाटील वय ३६ रा. गोरठण खालापूर याला पोलिसांनी अटक केली आहे.

मूळ फलटण सातारा येथील रहिवासी असलेली पीडित तरुणी गोरठण येथे राहत होती. दोन वर्षापासून अभिजीत सोबत तिचे प्रेम संबंध होते. तिला लग्नाचे आमिष दाखवून अभिजीत याने वारंवार शारीरिक संबंध केले. ती पाच महिन्याची गरोदर असताना जबरदस्तीने अभिजित याने गोळ्या देऊन गर्भपात घडवून आणला. पिडितेनी अभिजित कडे लग्न करण्याची मागणी केली असता त्याने तिला शिवी गाळी करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

पीडीतेने याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात अभिजीत विरुद्ध तक्रार दिल्यानंतर दिनांक ४नोव्हेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास अभिजितला अटक करण्यात आली आहे.याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे हे करीत आहेत.

# खालापूर तालुका भाजप उद्योग आघाडी अध्यक्षपदी राजेंद्र पालांडे



**चौक : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष पुरस्कृत खालापूर तालुका उद्योग आघाडी च्या अध्यक्षपदी उद्योजक राजेंद्र संतोष पालांडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारतीय जनता पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आणि उद्योजक राजेंद्र संतोष पालांडे यांची नियुक्ती खालापूर तालुका उद्योग आघाडी अध्यक्षपदी करण्यात आली असून ही निवड भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड या ठिकाणी कोकणातील पदाधिकारी यांची नव्याने निवड आणि नियुक्ती पत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थित पार पडला.

यावेळी वैभव खेडेकर यांच्यासह कोकणातील अनेक मातब्बर नेते उपस्थित होते. राजेंद्र संतोष पालांडे हे सक्रिय कार्यकर्ते असून तालुक्यातील बेरोजगार युवकांसाठी ते काम करतात, अनेक नवीन व्यावसायिक यांना त्यांचे मार्गदर्शन मिळत असते,योग्य सल्ला आणि प्रामाणिक काम करण्यात त्यांचा हातखंडा असल्याने त्यांची नियुक्ती झाली असल्याचे सांगण्यात आले.

# सतीश धारप भाजपच्या दक्षिण रायगड निवडणूक प्रमुखपदी

**अलिबाग : प्रतिनिधी**


भारतीय जनता पक्षाने दक्षिण रायगडमधील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी तयारी सुरू केली असून, या पार्श्वभूमीवर पक्षाचे वरिष्ठ नेते सतीश धारप यांची दक्षिण रायगड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या आदेशानुसार, धारप यांच्या नेतृत्वाखाली आता अलिबाग, पेण, मुरूड, रोहा, श्रीवर्धन आणि महाड या तालुक्यांतील नगरपरिषद, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे नियोजन, प्रचार मोहीम आणि उमेदवार समन्वयाची जबाबदारी राहणार आहे.

भाजप प्रदेश नेतृत्वाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी संघटनात्मक तयारी वाढविण्याचे आदेश दिले असून धारप यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण रायगडात पक्षाची ताकद अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. लवकरच तालुकावार बैठका घेऊन निवडणूक नियोजन, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि प्रचार धोरण यावर चर्चा करण्यात येणार आहे. सतीश धारप यांनी सांगितले की, या निवडणुकीत भाजप स्थानिक पातळीवरील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा आणि पर्यटनविकास या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करणार आहे. मतदारसंघातील नागरिकांशी थेट संवाद साधून विकासाच्या अजेंड्यावर पक्ष काम करेल.

> **माझ्यावर पक्षाने दाखविलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेन. कार्यकर्त्यांच्या बळावर आणि विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन दक्षिण रायगडात भाजप अधिक बळकट करुन पक्षाला निवडणुकित यश मिळवुन देण्याचा प्रयत्न करीन.**
> **–सतीश धारप, ज्येष्ठ भाजप नेते**

# खारघरमधील अधिराज टॉवरच्या ५१व्या मजल्यावर लागली आग



**पनवेल : वार्ताहर**

खारघर, सेक्टर ३६ येथील ५५ मजली अधिराज कॅपिटल सिटी टॉवरमध्ये रात्री ५१व्या मजल्यावरील एका बंद अपार्टमेंटमध्ये भीषण आग लागण्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, कारण इमारतीतील रहिवाशांनी तात्काळ आपत्कालीन मार्गाचा वापर करून सुरक्षित स्थळी स्थलांतर केले होते. मात्र, पनवेल परिसरात वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे परिसरातील आगीचे हे सत्र सुरूच असल्याचे चित्र यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे.

रात्री ११.२४ वाजता खारघर अग्निशमन दलाला अधिराज टॉवरमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंब आणि पाण्याचे टँकर घेऊन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता जास्त असल्याने काळंबोली अग्निशमन दलाच्या पथकालाही तातडीने मदतीसाठी पाचारण करण्यात आले. पनवेलचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंद असलेल्या ५१ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये शॉर्ट–सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# 'टीईटी'चे वेळापत्रक जाहीर; परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास शिक्षकांचे वेतन थांबवण्याचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजे टीईटीला शिक्षक आणि शिक्षक संघटनांकडून जोरदार विरोध होत असतानाच महाराष्ट्र राज्य शिक्षक परीषदेने टीईटी परीक्षेचे वेळापत्रकच जाहीर केले आहे. शिक्षक पात्रता परीक्षा पनवेलमधील सहा केंद्रांवर २३ नोव्हेंबर रोजी दोन सत्रात घेतली जाणार आहे. शिक्षकांच्या विरोधामुळे शासन यावर काय निर्णय घेते याकडे शिक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे हे या परीक्षेसाठी जिल्हा आयोजन व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीच्या सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी परिक्षेची बैठक व्यवस्था पोलिस बंदोबस्त,कस्टडी रुम (प्रश्न पत्रिका, उत्तर पत्रिका व स्वाक्षरीपट ठेवण्यासाठी), जिल्हा नियंत्रण कक्ष, परीक्षा केंद्र, अधिकारी, कर्मचारी नेमणूका, वाहन व्यवस्था, व्हिडीओ चित्रीकरण, भरारी पथक याबाबत माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती यांनी या परिक्षेचे आयोजन व संनियंत्रण करताना सर्व यंत्राणांनी अतिशय दक्षतेने काम करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान, या परीक्षेला शिक्षक वर्गातून तीव्र विरोध होत आहे. राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती . त्यावेळी त्यांनी टीईटी बाबत शासनाच्या वतीने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर संघटनेचा मुकमोर्चा स्थगित करण्यात आला होता; मात्र शासनाच्या वतीने कोणत्याही प्रकारची हालचाल झाली नाही. यामुळे शासनाच्या विरोधात रविवार, (ता.९ नोव्हेंबर) रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्याचे आयोजन करण्यात आले आहे.

टीईटी संदर्भामध्ये शिक्षकांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली असून अनेक जिल्हा परिषदेच्या पदोन्नत्या थांबलेल्या आहेत. आश्रमशाळेतील शिक्षकाना टीईटी उत्तीर्ण न झाल्यास वेतन थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टीईटी परीक्षा रद्द करा या प्रमुख मागणीसह शिक्षण सेवक पद्धत रद्द करण्यात यावी, १५ मार्च २०२४ चा संच मान्यता शासन आदेश रद्द करण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या शिक्षकांच्या आहेत.

**या केंद्रांवर होणार परीक्षा**

ही परीक्षा पनवेल शहरातील एकूण ६ केंद्रांवर घेण्यात येणार आहे , सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत पहिले सत्र तर दुपारी २.३० ते ५ या वेळेत दुसरया सत्रातील परीक्षा होणार आहेत. १) चांगु काना ठाकुर विद्यालय, जनार्दन भगत मार्ग सिडको कॉलनी, नवीन पनवेल २) के.आ. बांठिया माध्यमिक विद्यालय, सिडको कॉलनी, नवीन पनवेल , ३) सेंट जोसेफ माध्यमिक विद्यालय, प्लॉट नं. ९, सेक्टर ७, नवीन पनवेल (पू), ४) को.ए.सो. के.व्हि. कन्या विद्यालय व ज्युनियर कॉलेज, सावरकर चौक, वडाळे तलाव, जुने पनवेल, ५) को.ए.सो. व्हि. के. विद्यालय, वडाळे तलाव, जुने पनवेल ६) सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सिडको कॉलनी, कळंबोली.

> **टीईटी परीक्षेची अट खूपच जाचक आहे, या परीक्षेमुळे अनेक शिक्षकांची सेवा धोक्यात येणार आहे. या विरोधात राज्यातील शिक्षकांना आक्रमक भूमिका घेतली आहे. सरकारने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा.**
> **–राजेश सुर्वे, सरचिटणीस, मध्यवर्ती शिक्षक संघटना**

# कर्जतच्या दहिवलीत किल्ले बांधणी स्पर्धा

## राजा मित्र मंडळ, शिवमल्हार ग्रुप प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

दहिवली विकास मंचच्या वतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या गटात दहिवली राजा मित्र मंडळाने साकारलेल्या किल्ले रायगड, तर लहान गटात शिवमल्हार ग्रुपने साकारलेल्या किल्ले लोहगडच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला.

दहिवलीच्या घाटावरील प्रति आयोध्येच्या परिसरात त्रिपुरारी पौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच किल्ले स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री प्रभु रामचंद्र यांची पुजा करुन दिपोत्सवाची सुरुवात करणेत आली. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला रामचंद्र भागवत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मधुकर सुर्वे, सुनिल जाधव, विकास चित्ते, शशांक शेट्टी आदी उपस्थित होते. विकास चित्ते प्रास्ताविक करताना 'गावात सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी किल्ले स्पर्धा घेण्यात आल्याचे सांगितले. यशस्वी झालेल्या स्पर्धेकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

**पान १ वरुन**

## वंदे मातरम् @ १५० वर्ष

देशभरात १५० ठिकाणी, तर महाराष्ट्रात नागपूर, अकोला, ठाणे, रायगड, पुणे, अहिल्यानगर, कराड सातारा, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर या १० ठिकाणी कार्यक्रम होणार असून रायगड जिल्ह्याचा कार्यक्रम ७ नोव्हेंबरला नवीन पनवेल येथे होणार आहे.

वंदे मातरम् हे गीत भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील राष्ट्रप्रेम, ऐक्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या लढ्यात या गीताने असंख्य स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा दिली. हे गीत केवळ शब्दांची अभिव्यक्ती नसून भारतीय जनतेच्या भावविश्वाचे, स्वातंत्र्याच्या उत्कटतेचे आणि मातृभूमीवरील प्रेमाचे द्योतक आहे. वंदे मातरम्च्या इतिहासाची आणि राष्ट्रवादाच्या प्रेरणेची जनसामान्यांना माहिती करून देणे, युवकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करणे, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रचार व प्रसार आणि त्या अनुषंगाने राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्याला बळकटी देणे हे या कार्यक्रमांचे प्रमुख उद्देश आहेत. त्यानुसार बांठिया विद्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध विद्यालयांचे अडीच हजारांहून अधिक विद्यार्थी, विविध संस्था, संघटना, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असून नागरिकांनीही या महत्त्वपूर्ण उत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर भाजप रायगड निवडणूक प्रभारीपदाची जबाबदारी!

भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर उत्तर रायगडचे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. विजय आणि ठाकूर हे समीकरण कायम राहिले आहे. त्यांनी खासदार म्हणून संसदेत नेतृत्व केले आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा पक्षाला व्हावा यासाठी उत्तर रायगड निवडणूक प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर दक्षिण रायगडसाठी ज्येष्ठ नेते सतीश धारप निवडणूक प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत. त्यांच्याही नावाची पक्षाने घोषणा केली आहे.

# ऑनलाईन गेमिंगद्वारे सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीला पोलिसांकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

राज्यात सर्वत्र राष्ट्रीय सायबर सुरक्षा सप्ताह सुरु असून याच सप्ताहात प्रतिबंधित ऑनलाईन गेमिंग द्वारे फसवणूक करणारी टोळी नवी मुंबई पोलिसांनी उध्वस्त केली आहे. टोळीतील १२ जणांना अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी देशभरातील विविध बँकेच्या ८८६ खात्यांचा वापर केल्याचे निष्पन झाले आहे. शिवाय त्यांच्या विरोधात भारतातील एन.सी.सी.आर.पी. पोर्टलच्या एकुण ३९३ तकारी उघड झाले आहे. आरोपींनी आता पर्यंत ८३ कोटी ९७ लाख ४८ हजार २७८ रूपयांची फसवणुक झाल्याचे प्रथमदर्शी तपासात निष्पन्न झाले आहे.





इसाण उस्मानी मिनहाज शेख, हितेश पुनाराम देवांगन, सुनिल श्रवण देवांगन, तोमेशकुमार मोहीत उईके, राहुल राजु देवांगण,अंकीत रमेश सिंग, अभिषेक संजय सिंग, हरिषकुमार मदनलाल अर्पित संतेन्द्रकुमार सोनवाणी, रजत दिलीप शर्मा,लालबाबु राजेश्वर राम कुमार, कृष्णाअंशु अमित विश्वास, असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.अवैध्यरित्या गेमिंग ॲप चालविणाऱ्या आरोपींना बँक खाती पुरवणारा आरोपी इसम इम्रान शेख याला सीबीडी रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेतले.

आरोपीने नागरिकांना बँक खाते उघडण्यास लावुन बँकेचे पासबुक, एटीएम कार्ड, बँक खात्यास लिंक मोबाईल सिम कार्ड, धनादेश पुस्तिका , इत्यादीचे किट स्वत: कडे घेतले होते. हे किट आरोपी हा डोंबीवली येथे पाठवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या ठिकाणी पंच व तज्ञांच्या सहायाने मध्यवर्ती कक्ष पोलीस पथकाने धाड टाकली असता तेथे प्रतिबंधीत गेमींग व सायबर फसवणुकीचे ऑनलाईन प्रकार चालु असल्याचे दिसून आले. तेथील ऑनलाईन फसवणुक करीता असलेल्या साहित्यासह ५ आरोपींना पंचनामा कारवाई करून अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे,यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार,सचिन कोकरे, सतिश भोसले, महेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक राहुल भदाने, मंगेश वाट, पोलीस हवालदार अनिल यादव, नितीन जगताप, महेश पाटील, संजय राणे, पोलीस नाईक सतिश चव्हाण या पथकाने केली आहे.

# नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग :** जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी बुधवारी (दि.५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २२२ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून दोन लाख १५ हजार ५५० रुपये इतका दंड आकारला आहे.

## दुखवटा

**प्रभाकर बैलमारे**



**कर्जत :** नगरपरिषद हद्दीतील नानामास्तर नगर मधील प्रभाकर दामू बैलमारे यांचे अल्पशा आजाराने ५८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक कन्या, जावई, भाऊ, बहिणी, भावजया, पुतणे असा परिवार आहे.

# पनवेलमध्येही कुष्ठरोग शोधमोहीम अभियान

## तीन लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे होणार सर्वेक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७ पर्यंत जिल्हयात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्यासाठी अर्थात शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत आहे. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.



जिल्ह्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण तीन लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर यांनी नागरिकांना केले आहे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे, हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो.

या मोहिमेदरम्यान तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. तालुक्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण तीन लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी एकूण २६० पथके व ५१ पर्यवेक्षवा यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

पनवेल तालुक्यामध्ये ६५ कुष्ठरुग्ण औषधोपचाराखाली आहे. या मोहिमेदरम्यान आशा सेविका, स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी जावून सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्ण शोधणार असून नागरिकांनी आजाराबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. जनजागृती, तपासणी व उपचार या त्रिसूत्रीने कुष्ठरुग्ण शोध अभियान यशस्वी करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर यांनी केले आहे.

### कुष्ठरोगाची लक्षणे

शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, चालताना पायातून चप्पल निसटणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे,) हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडणे.

# स्थानिक कामगारांचे हक्क डावलून 'स्वीगी'चे काम पनवेलमध्ये चालू देणार नाही

## भाजपचा इशारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**


स्थानिक मुलांच्या न्याय हक्कांवर कोणतीही गदा येऊ देणार नाही आणि त्यांचे हक्क डावलून 'स्वीगी'चे काम पनवेलमध्ये सुरळीत होऊ देणार नाही, असा इशारा भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी दिला आहे, तसेच स्थानिक मुलांवर अन्याय करून बाहेरून जे डिलिव्हरीचे काम करण्यासाठी जी माणस मागवली आहेत ती गांजाचे सेवन करून नशेत काम करत आहेत. त्यामुळे उद्या जर कोणीतरी मोठी घटना घडली, तर त्याला जबाबदार कोण? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

स्वीगी इन्स्टामार्ट कंपनी प्रशासनाकडून पनवेलमध्ये डिलिव्हरीचे काम करणाऱ्या स्थानिक मुलांवर अन्याय करत आहेत. त्यांच्या पगारामध्ये कपात करणे, त्यांना कोणत्याही कारणावरून कामावरून काढून टाकण्याचे कंपनी करत आहे. या होणाऱ्या अन्याया विरोधात या स्थानिक मुलांनी २७ ऑक्टोबर कामबंद आंदोलन सुरू केले, परंतु कंपनी प्रशासन यावर कोणताही तोडगा काढण्याऐवजी, बाहेरून नवीन माणसे आणून आपले काम रेटत आहे. दरम्यान, स्थानिक मुलांना डावलून बाहेरून आलेले काही डिलिव्हरी बॉय गांजाचे सेवन करून काम करत आहेत. गुरुवारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी अशा प्रकारे नशेत काम करणाऱ्या एका डिलिव्हरी बॉयला पकडून दिले.

या वेळी त्यांनी आक्रमक पवित्रा घेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक मुलांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही, आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत असा विश्वास त्यांना दिला. तसेच जे डिलिव्हरीचे काम करत आहेत, ती माणसे गांजाचे सेवन करून नशेत काम करत आहेत. त्यामुळे उद्या जर कोणीतरी मोठी घटना घडली, तर त्याला जबाबदार कोण? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

# पनवेल मनपाने मागविल्या २२४ झाडांच्या तोडणीसाठी नागरिकांच्या हरकती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिकेने हरित पनवेलचे उद्दिष्ट गाठण्यासाठी यंदाच्या वर्षात सव्वा लाख वृक्ष लागवड हाती घेतले आहे, परंतू दूसरीकडे सिडको मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तळोजा येथील घोटचाळ गावाशेजारी सुरु असलेल्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारामध्ये अडचण ठरणारी ७ ते १० वर्षे वयाची २२४ झाडांची तोड करण्याचा प्रस्ताव पुढे आल्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या वृक्षतोडीबद्दल नागरिकांना माहिती मिळावी यासाठी महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हरकती मागविण्याची जाहीर नोटीस बुधवारी प्रसिद्ध केली आहे.

या झाडांमध्ये सुबाभूळ, जांभूळ, करंज, काजू, साग, निम, कदंब, सोनमोहर, आंबा, गुलमोहर, बहावा यांसारख्या विविध प्रजातींचा समावेश आहे. ही झाडे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूखंडाभोवती परिधीय मार्ग आणि जलनिस्सारणासाठी (पावसाळी पाण्यासाठी नाला) बांधकामासाठी अडथळा ठरत आहेत. महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेल्या नोटिशीत म्हटले आहे की, नागरिकांनी या झाडांच्या तोडणीसंबंधी हरकती किंवा सूचना १२ नोव्हेंबरपर्यंत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास वृक्ष प्राधिकरण झाडतोडीस सशर्त परवानगी देण्याची कार्यवाही करणार असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी जुलै महिन्यात कळंबोली सर्कलच्या विस्तारासाठी १० ते ६० वर्षे वयाच्या ६९० झाडांचे पुनर्रोपण करण्याचा प्रस्ताव आला होता. त्यावेळी नागरिकांच्या हरकती मागवल्या असूनही एकही हरकत महापालिकेकडे आली नव्हती. सध्या या पुनर्रोपणासाठी एमएसआरडीसीने प्रतिझाड एक हजार रुपयांप्रमाणे अनामत रक्कम भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर उरण नगर परिषदेची होणार निवडणूक

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



तब्बल चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर २ डिसेंबर रोजी उरण नगर परिषदेची निवडणूक नुकतीच जाहीर झाली आहे. यामुळे सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीसाठी कामाला लागले आहेत.

२०१६ साली झालेल्या उरण नगर परिषदेच्या निवडणुकीत ९ प्रभागातून १८ सदस्य आणि एक नगराध्यक्ष अशी १९ पदांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या सायली म्हात्रे, शिवसेनेच्या अर्चना शिंदे आणि काँग्रेस, राष्ट्रवादी, शेकाप आघाडीच्या नाहिदा ठाकूर निवडणुकीच्या रिंगणात होत्या, मात्र स्वबळावर निवडणूक उतरलेल्या भाजपच्या सायली म्हात्रे यांनी शिवसेनेच्या अर्चना शिंदे यांना पराभूत केले होते, तर आघाडीच्या नाहिदा ठाकूर तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या होत्या. उनपच्या नऊ प्रभागातून १८ जागांपैकी स्वबळावर निवडणूक उतरलेल्या भाजपने १३ जागा पटकाविल्या होत्या.

स्वबळावरच निवडणूक लढविणाऱ्या शिवसेनेला फक्त पाच जागांवर समाधान मानावे लागले होते, तर शेकापचे माजी आमदार विवेक पाटील काँग्रेसचे नेते महेंद्र घरत, तालुका अध्यक्ष जे.डी.जोशी, तत्कालीन राष्ट्रवादीचे दिवंगत नेते प्रशांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या आघाडीला एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यामुळे भोपळाही फोडता न आलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी, शेकाप या प्रमुख राजकीय पक्षांची आघाडी चांगलीच तोंडघशी पडली होती. स्वबळावरच १३ सदस्य आणि नगराध्यक्षपदही पटकाविलेल्या भाजपने शिवसेना व आघाडीला मात देत उरण नगर परिषदेवर निर्विवाद सत्ता स्थापन केली होती.

पाच वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतरही उनपच्या निवडणूक मुदतीत झाली नाही. यामुळे उनपवर जानेवारी २०२१पासूनच प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली आहे. मंगळवारी (दि.४) निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. तब्बल चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय राजवटीनंतर उनपची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणाऱ्या निवडणुकीत उनपची प्रभाग संख्या नऊवरून १० झाली आहे तसेच या दहा प्रभागातून नगराध्यक्ष पद वगळून सदस्यांची संख्याही १८वरून २१ झाली आहे.

## निवडक

### मुलीवर अत्याचार; तरुणाला अटक

**पनवेल :** उलवे भागातील २३ वर्षीय तरुणाने १४ वर्षीय मुलीवर निर्जनस्थळी लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी उलवे पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. उलवे परिसरात राहणाऱ्या मुलाची नवरात्रीमध्ये पीडितेशी गरबा खेळताना ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपीने मुलीसोबत मैत्री वाढवली. दोघेही कारमधून शिवमंदिरालगत खाडीकिनारी फिरायला गेले होते. या वेळी तरुणाने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

### सोन्याची चेन आणि अंगठीची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून सोन्याची चेन आणि अंगठी चोरून नेल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात १ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. लीला मालू या बालाजी सिम्फनी, सुकापूर येथे राहत असून त्यांनी सोन्याची चेन आणि सोन्याचे अंगठी मेहंदी लागून खराब होईल म्हणून बेडरूममध्ये असलेल्या कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवले. त्यांनी दुसऱ्या दिवशी कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवलेली चेन अंगठी पाहिले असता ती सापडून आली नाही. २१ ग्राम वजनाचे दागिने चोरीला गेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### गांजा विकणाऱ्याला तळोजातून अटक

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील पडघे गावाशेजारी गांजाविक्रीसाठी आलेल्या ४० वर्षीय व्यक्तीला तळोजा पोलिसांनी अटक केली. पडघे गावाच्या शेजारी शिवाजी शेवाळे हा हातामध्ये पिशवी घेऊन उभा होता. या वेळी पोलिस शिपाई पाटील यांना शेवाळे याच्यावर संशय आला. या वेळी पिशवीत अमली पदार्थ गांजा असल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ ७६ हजारांचा गांजा जप्त केला असून, यप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

### १० नोव्हेंबरला लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोंकण विभागाच्या अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम यांनी कळविले आहे.



**पनवेल : ६९व्या एसजीएफआय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा २०२५-२६साठी वीर संजय भोईर यांची निवड झाली असून ही स्पर्धा ईटानगर, अरुणाचल प्रदेश येथे होणार आहे तसेच निहाल संजय भोईर यांचा वर्ल्ड तायक्वांदो अंडर-२१ चॅम्पियनशिप, केनियासाठीच्या ओपन सिलेक्शन ट्रायल्समध्ये सहभाग निश्चित झाला आहे. या निवड चाचण्या ८ व ९ नोव्हेंबर रोजी सिरसा, हरियाणा येथे होणार आहेत. दोन्ही खेळाडूंना माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# डी.डी. विसपुते कॉलेज आणि पीआयबीएमचा सामंजस्य करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



आदर्श शैक्षणिक समूह संचलित डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल आणि Pune Institute of Business Management (PIBM), पुणे या दोन प्रतिष्ठित संस्थांदरम्यान सामंजस्य करार गुरुवारी (दि.६) झाला.

याचा उद्देश संशोधन व विकास कार्यक्रम, शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे कौशल्यवर्धन, प्लेसमेंट संधी, विद्यार्थी आणि शिक्षक एक्स्चेंज कार्यक्रम तसेच भविष्यकालीन शैक्षणिक सहकार्य वाढविणे हा आहे.

हा करार आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन माननीय श्री. धनराजजी विसपुते व संगीता विसपुते यांच्या प्रेरणेने आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे आणि Pune Institute of Business Management (PIBM), पुणे यांचे प्रतिनिधी मयुर पटेल यांच्या पुढाकाराने पूर्ण करण्यात आला.

या वेळी उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, तसेच प्राध्यापिका डॉ. नेहा म्हात्रे उपस्थित होत्या. कराराची प्रभावी पूर्तता आणि समन्वय साधण्यासाठी IQAC इंचार्ज डॉ. प्रितेश वाढे, प्रा. राजू गायकवाड, प्रा. निलेश अडसुळे व प्रा. सुषमा संपकाळ यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# पनवेलमध्ये कार्तिक पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

## रामेश्वर महादेव देवस्थान येथे 'जाणीव'तर्फे कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामेश्वर महादेव देवस्थान आणि जाणीव एक सामाजिक संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षीही त्रिपुरी पौर्णिमा, अर्थात कार्तिक पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल शहरातील श्री रामेश्वर महादेव देवस्थान येथे बुधवारी (दि.५) सायंकाळी हा पवित्र आणि मंगलमय कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या दिपोत्सव कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहभागी होत दीपप्रज्वलन केले तसेच श्री रामेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन आरती केली. दरम्यान, या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट देऊन महादेवाचे दर्शन घेतले.






या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, माजी नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, माजी नगरसेविका सुरेखा मोहकर, नीता माळी, रूचिता लोंढे, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, श्री रामेश्वर महादेव देवस्थानचे अध्यक्ष उमेश इनामदार, अभिषेक पटवर्धन, रघुनाथ बहिरा, प्रीतम म्हात्रे उर्फ पिंट्या, लीना पाटील, सुहासिनी केकाने, सुहासिनी शिवणेकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवस्थान परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या दीपोत्सवामुळे मंगलमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## संपादकीय

# जनताच उत्तर देईल

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान गुरुवारी पार पडले. मतदानाच्या बरोबर आदल्या दिवशी काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाली असा आरोप केला. हरियाणातील निवडणुकांना आता वर्ष उलटले आहे. त्या निवडणुकांच्या निकालानंतर काँग्रेस पक्षाने ना मतदानप्रक्रियेविषयी तक्रार नोंदवली, ना पुनर्मोजणी मागितली, ना न्यायालयात याचिका दाखल केली. पण बिहारमधील मतदानाच्या आदल्या दिवशी राहुल गांधी निवडणूक आयोगाविरोधात तथ्यहीन आरोप करतात याला काय म्हणावे?

**बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तेथील मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण करण्यासाठी राहुल गांधी यांनी सादरीकरणाचा नेहमीचा खेळ केला खरा, पण राहुल यांचा कथित हायड्रोजन बॉम्ब कायमच फुस्स का होतो याचे उत्तर त्यांनीच द्यायला हवे आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने मात्र राहुल गांधी यांच्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले असून २०२४च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत फसवणूक झाली तर त्यावेळी मतदानकेंद्रांमध्ये हजर असलेले काँग्रेसचे मतदान प्रतिनिधी काय करत होते, असा नेमका सवाल आयोगाने केला आहे. मतदानादरम्यान प्रत्येक पक्षाचा एक पोलिंग एजंट असतो. बाहेरील निरीक्षक असतात. मतदानात तफावत आढळल्यास, याचिका दाखल करण्याचा, न्यायालयात जाण्याचा पर्याय राजकीय पक्षांना वा उमेदवारांना उपलब्ध आहे. पण राहुल गांधी न्यायालयात न जाता निव्वळ सादरीकरणे करत बिनबुडाचे आरोप करीत सुटले आहेत असे खेदाने म्हणावे लागते. बिहारमधील बहुचर्चित एसआयआर अर्थात मतदारयादी पुनर्रचना प्रक्रियेदरम्यानही काँग्रेस पक्षाने कोणतेही अपील किंवा आक्षेप दाखल केलेले नाहीत याकडेही आयोगाने लक्ष वेधले आहे. बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल फेरतपासणीदरम्यान, काँग्रेसच्या बूथस्तरीय प्रतिनिधींनी कथित बनावट, स्थलांतरित किंवा मृत मतदारांबद्दल कोणतेही दावे किंवा आक्षेप नोंदवलेले नाहीत. असे का, असा उलटा सवालच वारंवार निवडणूक आयोगावर वाट्टेल तसे आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांना आयोगाच्या अधिकाऱ्यांनी विचारला आहे. बहुदा, आपले बिनबुडाचे आरोप न्यायालयात टिकणार नाहीत हे राहुल गांधी यांना नीट माहीत असावे. किंवा, हरतऱ्हेने प्रयत्न करूनही बिहारमध्ये आपल्या पक्षाच्या हाती फारसे काही लागणार नाही याची जाणीव त्यांना असावी. म्हणूनच बिहारमधील मतदानाच्या पूर्वसंध्येला हे असे खोटेनाटे आरोप करून राहुल गांधी यांनी मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. गेला बराच काळ राहुल गांधी पुन्हा पुन्हा ईव्हीएम घोटाळा आणि मतचोरी यावरच आपल्या पक्षाच्या अपयशाचे खापर फोडू पाहात आहेत. परंतु यातून त्यांचीच पराभूत मानसिकता समोर येत राहते हे त्यांच्या ध्यानात कसे येत नाही. आपल्या पराभवाची कारणे प्रत्येक पक्षाला आत्मपरीक्षण करूनच शोधावी लागतात. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालांबाबतही त्यांनी असेच आरोप करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित आकडेवारीसह राहुल यांची पोलखोल केली. परंतु अशा अनुभवांतून तरी राहुल गांधी आपल्या कार्यशैलीत काही बदल करतील अशी शक्यता दिसत नाही. परंतु त्यांच्या फुसक्या सादरीकरणाचा बिहारच्या राजकीयदृष्ट्या अतिशय सजग अशा मतदारांवर काही परिणाम होण्याची शक्यता नाही. आपल्या तथ्यहीन आरोपांसोबतच जेन-झीला म्हणजे तरुणांना भडकावण्याचा प्रयत्नही राहुल गांधी आता करू लागले आहेत. परंतु त्यांच्या या कारवायांना बिहारची जनता आणि जेन-झीही मतपेटीतूनच सडेतोड उत्तर देईल एवढे निश्चित.**

# रायगडातील पर्यटनाला मिळणार नवी झळाळी

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

कोकणातील पाच समुद्रकिनाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'ब्लू फ्लॅग मानांकन' प्रमाणपत्र मिळवले आहे. यात रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन आणि नागाव समुद्रकिनार्याचा समावेश आहे. जागतिक पातळीवर स्वच्छ, सुंदर समुद्र आणि पर्यावरण पुरक किनार्यांना ब्लू फ्लॅग मानांकन दिले जाते. या पाचही किनार्यांच्या पायाभूत सुविधा विकासासाठी प्रत्येकी ४ कोटी रुपये राज्य सरकारने मंजूर केले आहेत. त्यातील प्रत्येकी १ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.ब्लू फ्लॅग मानांकन मिळाल्यामुळे भविष्यात रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनार्यांवर जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील. ज्यामुळे पर्यटनाबरोबर स्थानिक रोजगाराला चालना मिळेल. रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला नवी झळाळी मिळीले. ज्या दोन समुद्रकिनार्यांना ब्लू फ्लॅग मानोकन मिळाले आहे. तेथे सुविधा मिळतील परंतु इतर समुद्रकिनार्यांकडे दर्लक्ष होता कामा नये. इतर समुद्रकिनाऱ्यांवरदेखील पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा निर्माण केल्या पाहिजेत.



डेन्मार्क येथील फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थे मार्फत हे मानांकन दिले जाते. ३३ निकषांचे मूल्यमापन करून ब्ल्यू फ्लॅग दर्जा दिला जात असतो. पर्यावरण शिक्षण, जल गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण व्यवस्थापन तसेच सेवा सुरक्षा, सेवा या घटकांचा यात समावेश असतो. या घटकांच्या पडताळणीनंतर समुद्र किनार्यांना ब्ल्यू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र दिले जात असते. कोकणातील पाच समुद्र किनार्यांनी या मानांकनासाठी अर्ज केले होते. ज्याची पडताळणी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झाली होती. या पडताळणी नंतर राज्यातील पाच किनार्यांना हे मानांकन देण्यात आले आहेत. या पुर्वी देशातील १३ समुद्र किनार्यांना हे मानांकन देण्यात आले होते. मात्र त्यात राज्यातील एकाही समुद्र किनार्याचा समावेश नव्हता. या मानांकनामुळे कोकणातील समुद्रकिनारे जागतिक पर्यटन नकाशावर ठळकपणे झळकतील.

महाराष्ट्र सरकार वन विभाग आणि नागाव ग्रामपंचायत यांच्यात एक सामंजस्य करार झाला होता. जैवविवीधता संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन, सुरक्षितता, आणि पर्यटन सोयीसुविधा यावर भर देण्यात आला होता. नागाव ग्रामपंचायतीने हे मानांकन प्राप्त व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. श्रीवर्धनचा समुद्र किनारा नगर परिषदेने विकसित केला आहे. निसर्ग चक्रीवादळात या समुद्र किनार्याचे मोठे नुकसान झाले होते. मात्र राज्यसरकारकडून निधी आणून राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या समुद्र किनार्याचे नव्याने सुशोभिकरण करून घेतले होते. समुद्र किनार्या शाश्वत आणि पर्यावरण पूरक विकासासाठी प्रयत्न करण्यात आले होते. त्यामुळे नागाव आणि श्रीवर्धन समुद्रकिनारे हे गेल्या काही वर्षात पर्यटकांचे पसंतीचे पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास आले आहेत. दरवर्षी लाखो पर्यटक या ठिकाणी भेट देत असतात. ब्लू फ्लॅग प्राप्त झाल्याने हे दोन्ही समुद्रकिनारे जागतिक पातळीवर आदर्श समुद्रकिनारे म्हणून समोर येणार आहेत.

डेन्मार्क येथील फाउंडेशन फॉर एन्व्हायर्नमेंटल एज्युकेशन संस्थेने प्रायोगिक तत्त्वावर समुद्रकिनार्यावरील सुरक्षा, पर्यावरण संवर्धन, पाण्याची गुणवत्तेच्या निकषावर ब्ल्यू फ्लॅग पायलटचा दर्जा दिलेला आहे. यासाठी किनार्यावरील शौचालये, पिण्याचे पाणी, पार्किंग, कपडे बदलण्याच्या खोल्या, पाळणाघरे, तात्पुरती दुकाने, कचराकुंडी, जीवरक्षक टॉवर, सौरदिवे, दिशादर्शक मंडळे, कचरा व्यवस्थापन, पथदिवे, सुरक्षा रक्षक, प्रवेश रस्ते इत्यादी मूलभूत सुविधा पुरवणे आवश्यक आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पर्यटन संचालनालयाने २०२५-२६ वर्षाच्या प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत ब्लू फ्लॅग पायलटचा दर्जा मिळाल्यानंतर त्या पाच समुद्रकिनार्यांवर पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यासाठी २० कोटींच्या प्रशासकीय खर्चाला राज्य शासनाने मान्यता दिली. त्यापैकी अलिबाग तालुक्यातील नागाव, श्रीवर्धन समुद्रकिनार्यांच्या सौंदर्गीकरणासाठी प्रत्येकी १ कोटी ४० रुपये वितरित करण्यात आले आहेत. त्यामुळे भविष्यात रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला नवी झळाळी मिळणार आहे.

विस्तीर्ण व स्वच्छ समुद्रकिनारे, नारळी पोफळीच्या बागा, हिरवी वनराई, गड किल्ले, लेण्या याचे पर्यटकांना नेहमीच आप्रुप राहीले आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात गोव्या पाठोपाठ कोकणही पर्यटकांसाठी फेवरेट डेस्टिनेशन बनत आहे. सुट्ट्या दिवसात आणि विकएंडला रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारे सध्या पर्यटकांनी गजबजले असतात.रायगडमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे.

# पुराण पुरुष

गावामध्ये एक पिंपळाचं जुनं झाड आहे. बऱ्याच दिवसानंतर त्या पारावर बसले होते. बाजूलाच मुलांचा कल्ला सुरू होता. एका कोपऱ्यात सर्व ज्येष्ठ मंडळींची चर्चा रंगली होती. एका बाजूला बायका घोळका करून बसल्या होत्या. असा हा पिंपळपार नेहमीच गजबाजलेला असतो.

अकरावीत असताना पुराणपुरुषाला श्रद्धांजली असा काकासाहेब कालेलकरांचा एक धडा होता. त्यावेळी त्यांनी झाडाचं ज्या पद्धतीने केलेलं वर्णन होतं आज त्याची प्रचिती आली... हा पिंपळसुद्धा मला एखाद्या पुराण पुरुषाप्रमाणेच वाटतो. गावातील प्रत्येक घटनेचा साक्षीदार आहे आहे हा. माझ्या आजी-आजोबांच्या जन्माआधीपासून हा पिंपळ इथे उभा आहे. गावामध्ये प्रवेश करताचक्षणी आधी या पिंपळाचं दर्शन होतं. कोणतीही सभा असो, लग्नवरात असो वा प्रेतयात्रा पिंपळपारावर आल्याशिवाय ती पूर्णच होऊ शकत नाही. असा हा पिंपळ गावाची ओळख आहे. गावाप्रमाणे प्रत्येक ग्रामस्थाच्या कुटुंबाचा तो अविभाज्य घटक आहे.

आता हा पिंपळ म्हातारा झालाय, दाढी पिकल्याप्रमाणे त्याच्या जटा आता सफेद झाल्या आहेत. कमरेत वाकल्याप्रमाणे वाटतो आहे. तरीही त्याच्याविषयी एक प्रकारचा दरारा आणि आदर आहे. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याला जशी वागणूक दिली जाते तशीच वागणूक या पिंपळाला दिली जाते. लहानपणी सर्व सवंगडी येथे खेळत असू, येथे गप्पा-गोष्टी करत असू. सवंगड्यांशी बोलताना कधी या पिंपळाशी बोलायची सवय लागली कळलंच नाही. मग मैत्रिणींशी झालेली भांडणं असोत, परीक्षेत मिळालेले कमी गुण असोत वा काही गुपितं असोत. मनातलं सगळं काही पिंपळाला माहिती असे. हा पिंपळ माझा खरा सोबती झाला, कारण मी सांगेन ते तो निमूटपणे ऐकून घेई.

लग्न झाल्यानंतर पिंपळाची आणि माझी भेट फार कमी होई. आज तर बऱ्याच दिवसांनी नव्हे-नव्हे कित्येक महिन्यांनी मी येथे आले. पिंपळाला शांतीचं प्रतीक मानतात कदाचित म्हणूनच बुद्धांनी साधनेसाठी या झाडाची निवड केली असावी. झाडाच्या पानांचा आकार हृदयासारखा असतो. याचा प्रत्यय गावात होणाऱ्या अनेक तंट्याना याच झाडाखाली बसून सोडवल्यानंतर गैरसमजाने कलुषित झालेल्या हृदयांना जुळलेलं पाहिलं त्यावेळी आला.

आता गाव बदललाय, माणसंही बदलली आणि पिंपळाविषयी आदरसुद्धा वाढलाय. या अनेक वर्षात पिंपळानं कैक स्थित्यंतरे पाहिली व अजून पाहणार आहे. तरीही गावातील प्रत्येकाच्या सुखाचा साक्षीदार असलेला हा पिंपळ तितक्याच खंबीरपणे उभा आहे. अजून अनेक पिढ्यांना आधार देण्यासाठी या पुराण पुरुषाला हजारो वर्षांचं आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**

## बदलते तंत्रज्ञान

# टीव्हीएस मोटरची नवीन ई-स्कूटर, ऑर्बिटर लाँच

आयक्यूब आणि टीव्हीएस एक्स नंतर ही कंपनीची भारतातील तिसरी ई-स्कूटर आहे. कंपनीचा दावा आहे की ती एकदा पूर्ण चार्ज केल्यावर १५८ किमी (आयडीसी) ची रेंज देते. किंमती ९४,९०० (दिल्ली, एक्स-शोरूम) पासून सुरू होतात, तर मध्य प्रदेशात किंमती १०४,६०० पासून सुरू होतात.



ऑर्बिटर सहा रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. टीव्हीएसने स्कूटरवर क्रूझ कंट्रोल, हिल होल्ड फंक्शन आणि रिव्हर्स पार्किंग असिस्ट सारखी वैशिष्ट्ये दिली आहेत. टीव्हीएस ऑर्बिटर ३ वर्षांची वॉरंटी आणि ५०,००० किमीसह येते.

डिझाइन: ६ रंग पर्यायांसह एअरोडायनामिक डिझाइन

टीव्हीएसने ऑर्बिटरची रचना दररोजच्या प्रवासात एक नवीन अनुभव देण्यासाठी केली आहे. त्याची रचना स्वच्छ असली तरी व्यावहारिक आहे.

बॉक्सी बॉडी पॅनल्स आणि लांब व्हिझरसह, ही बॉक्सी-शैलीची ई-स्कूटर आयक्यूबसारखीच दिसते, परंतु ती अधिक सडपातळ आणि अधिक वायुगतिकीय आहे.

पुढच्या ॲप्रनमध्ये एलईडी डेटाइम रनिंग लाइट्स (डीआरएल) आणि हँडलबारवर बसवलेला एलईडी हेडलॅम्प आहे. समोरचा ॲप्रन तीक्ष्ण आणि साधा आहे, तर मागील भागात कॉम्पॅक्ट टेललाइट आहे.

स्कूटरची सीट ८४५ मिमी लांब आणि सपाट आहे, जी रायडर आणि मागे बसणाऱ्या दोघांनाही आराम देते. २९० मिमी सरळ फूटबोर्डमुळे पायांची जागा आणि उपयुक्तता वाढते.

१६५ मिमी ग्राउंड क्लीयरन्स आणि ३४ लिटर बूट स्पेसमुळे ऑर्बिटर रोजच्या वापरासाठी आरामदायी बनते, जरी प्लास्टिक बॉडी थोडी स्वस्त वाटू शकते.

ही ई-स्कूटर सहा रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: निऑन सनबर्स्ट, स्ट्रॅटोस ब्लू, लूनर ग्रे, मार्टियन कॉपर, कॉस्मिक टायटॅनियम आणि स्टेलर सिल्व्हर.

एकंदरीत, त्याची रचना तरुणांसाठी आणि दैनंदिन वापरासाठी ठीक आहे, परंतु प्रीमियम लूकची अपेक्षा करणाऱ्यांची थोडी निराशा होऊ शकते.

कामगिरी : कमाल वेग ६८ किमी प्रतितास आणि रेंज १५८ किमी आहे.

# थोर स्वातंत्र्यसेनानी बिपिनचंद्र पाल

## निमित्त



बिपिनचंद्र पाल भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर बंगाली नेते होते. त्यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८५८ रोजी उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात पॉइल (सिल्हेट जिल्हा) या गावी झाला. सध्या हा प्रदेश बांगलादेशात अंतर्भूत होतो. त्यांचे वडील रामचंद्र पाल हे जमीनदार व वकील होते. हळूहळू ते मुन्सफच्या जागेपर्यंत चढले. ते वैष्णवपंथी होते.

बिपिनचंद्रांची आई नारायणदेवी विशेष शिकलेल्या नव्हत्या, पण शिस्त व धार्मिक बाबी त्या कटाक्षाने पाळत. बिपिनचंद्रांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. त्यानंतर त्यांनी दोन मिशनरी व एका सरकारी माध्यमिक विद्यालयांतून इंग्रजी शिक्षण घेतले आणि कलकत्ता विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली (१८७४). पुढे ते प्रेसिडेन्सी महाविद्यालयात दाखल झाले पण दोन वेळा नापास झाल्यावर त्यांनी या औपचारिक शिक्षणास कायमचा रामराम ठोकला (१८७८). या सुमारास ते ब्राह्मोसमाजाकडे आकृष्ट झाले. त्याची अधिकृत दीक्षा त्यांनी नंतर घेतली. त्यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या वडिलांस फार दुःख झाले. बिपिनचंद्रांनीही अखेरीस आपला दुराग्रह सौम्य केला.

बिपिनचंद्रांचे एकूण आयुष्य कष्टमय होते. विद्यार्थिदशेतच त्यांनी विपुल वाचन केले. ब्राह्मोसमाजाचे केशवचंद्र सेन यांच्या विचारांची छाप त्यांच्यावर पडली. याशिवाय पी.के. रॉय. आनंदमोहन बोस, द्वारकानाथ गांगुली वगैरे विद्वानांचा प्रभाव त्यांच्यावर होता. कलकत्त्याच्या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून काही काळ त्यांनी काम केले. ग्रंथालयाचे ते चिटणीसही होते.बिपिनचंद्र धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी शिष्यवृत्ती घेऊन इंग्लंडला गेले, पण ही शिष्यवृत्ती त्यांनी एक वर्षातच सोडली व इंग्लंडमध्ये ते राजकीय कार्य करू लागले. १९०१ साली ते भारतात परतले. भारतात आल्यानंतर न्यू इंडिया हे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. बंगालच्या फाळणीनंतर लोकमान्य टिळक व लाला लाजपतराय यांच्याबरोबर स्वदेशीच्या चतुःसुत्रीचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला. सारा बंगाल त्यांनी आपल्या व्याख्यानांनी जागृत केला. बहिष्कार व निःशस्त्र प्रतिकार यांचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी वंदेमातरम् हे दैनिक सुरू केले (१९०६). त्यांनी अरविंद घोष यांना संपादक केले. यानंतर ते इंग्लंडला जाऊन राहिले या काळात एक नवीन विचार त्यांनी प्रसृत केला आणि भारत स्वयंशासित वसाहत म्हणून ब्रिटिशांना सहकार्य देईल, हे तत्त्व मांडले. या तत्त्वास एम्पायर-आयडिया हे नाव त्यांनी दिले.

बिपिनचंद्र हे एक तत्त्वचिंतक होते. त्यांना देशाची सर्वांगीण तयारी झाल्याशिवाय स्वातंत्र्य नको होते. त्यांची राष्ट्रीयत्वाची कल्पना धर्मभावनांशी निगडित होती. ते होमरूल लीगचे सभासद होते. बिपिनचंद्रांनी अनेक वृत्तपत्रे काढली. वंदेमातरमसारखी जहाल वृत्तपत्रे अतिशय लोकप्रिय झाली. पहाडी आवाजाचे एक प्रभावी वक्ते म्हणून त्यांची ख्याती होती. लाल (लाला लजपतराय), बाल (बाळ गंगाधर टिळक) व पाल या त्रयीने वंगभंग, स्वदेशी व बहिष्काराचे प्रचंड आंदोलन करून जनजागृती केली.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# लवकरपेक्षा उशिरा उठणे चांगले? तज्ज्ञ सांगतात...

अनेकजण रात्री उशिरापर्यंत जागे राहतात आणि सकाळी उशीरा उठतात. आपल्याला लहानपणापासून घरात लवकर झोपा लवकर उठा असे शिकवले जाते, मात्र एका नवीन संशोधनात असं समोर आलंय की, लवकर उठण्यापेक्षा उशिरा उठणे चांगले आहे. चांगली झोप तुम्हाला आतून बरे करू शकते आणि पुढील दिवसासाठी तुमच्या शरीराला ऊर्जा देऊ शकते.



न्यूरोसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार असे आढळून आले की, जे उशिरापर्यंत झोपतात ते बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि स्मरणशक्तीच्या चाचण्यांमध्ये चांगले गुण मिळवतात. या विषयी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटल्सचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी सविस्तर माहिती दिली आहे. डॉ कुमार सांगतात दोन प्रकारचे लोक असतात, एक जे व्यक्ती लवकर झोपणे आणि लवकर उठणे पसंत करतात तसेच त्यांच्या क्रियाकलापांचे नियोजन करतात.

दुसरे म्हणजे, उशिरा झोपणे आणि उशिरा उठणे पसंत करतात तसेच त्यांचे नियोजन करतात. रात्री १२ च्या आधी झोपणे गरजेचे आहे, मात्र हल्ली बरेच जण बारा वाजल्यानंतर झोपतात. याचा अर्थ, जेव्हा लोक झोपेचं चुकीचं वेळापत्र फॉलो करतात तेव्हा ते चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरतात. संशोधनानुसार उशिरा उठल्यानं काही गोष्टींमध्ये आपल्याला फायदा होत असला तरीही नुकसान हे मोठ्या प्रमाणात होतं.

डॉ. कुमार म्हणाले, सात ते नऊ तास झोपण्याची शिफारस केली जाते. सात तासांपेक्षा कमी किंवा नऊ तासांपेक्षा जास्त झोप घेतल्यास एखाद्या व्यक्तीला लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि काही प्रकरणांमध्ये कर्करोग यांसारखे आजार होण्याचा धोका असतो; तर एखाद्या व्यक्तीला चांगल्या झोपेपेक्षा कमी झोप मिळत असेल तर अशा प्रकरणांमध्ये धोका जास्त असतो, असे डॉ. कुमार म्हणाले.

फोनच्या व्यसनामुळे आणि सोशल मीडिया आणि टीव्ही पाहण्याच्या सवयीमुळे आजकाल बहुतेक लोक रात्री उशिरापर्यंत जागे राहतात, त्यामुळे त्यांना चांगली झोप लागत नाही आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. मध्यरात्री झोप लागते असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर अशा परिस्थितीत झोपण्यापूर्वी काही सोपे व्यायाम केल्याने तुम्हाला चांगली झोप येऊ शकते, यामुळे स्नायूंना आराम देण्यासोबतच शरीर लवचिक होण्यासही मदत होते.

# पेण पालिका प्रभाग १२मध्ये स्थानिक मतदारांची नावे गायब

## भाजपचे अभिराज कडू यांची प्रशासनाकडे तक्रार





**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १२ च्या निवडणुकी संदर्भात मोठा वाद निर्माण झाला आहे. या प्रभागातील अभिराज कडू यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या अंतिम मतदार यादीत गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करत प्रशासनाकडे औपचारिक तक्रार दाखल केली आहे.

यावेळी त्यांनी सांगितले कि, प्रभाग क्रमांक १२ ची मतदारयादी पूर्णपणे चुकीची असून प्रभाग क्रमांक ११, ७,व ८ आणि ४ मधील मतदारांची नावे चुकीने १२ व्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. यासोबतच प्रभाग १२ मधील स्थानिक आणि मूळ मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. कडू यांनी प्रशासक अधिकाऱ्यांकडे या त्रुटींची सविस्तर यादी सादर केली असून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

त्यांनी यासंदर्भात प्रशासक अधिकारी यांच्याशी फोनवर चर्चा केली असून राज्य निवडणूक आयोगालाही मेलद्वारे तक्रार पत्र पाठवले आहे. जोपर्यंत प्रभाग क्रमांक १२ ची मतदार यादी निष्पक्षपणे दुरुस्त होत नाही, तोपर्यंत त्या प्रभागाची निवडणूक घेऊ नये अशी थेट मागणी अभिराज कडू व स्थानिक नगरसेविका वैशाली कडू यांनी केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत संजय कडू, सदाशिव पाटील, विवेक बामणे, सागर पाटील आदींसह नागरिक उपस्थित होते.

# ‘लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थी महिलांची बँकेत गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता बँकेत जमा झाल्याची माहिती मिळाल्यावर बँकेत लाभार्थी यांची मोठी गर्दी पाहण्यास मिळत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा हप्ता काल बँकेत जमा झाला, ही माहिती समजल्यावर लाभार्थी यांची गर्दी आज बँकेत दिसली. लाडकी बहीण ही महाराष्ट्र सरकारची एक आर्थिक मदत योजना आहे, ज्या अंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १,५००(दीड हजार) थेट त्यांच्या आधारशी जोडलेल्या बँक खात्यात जमा केले जातात. या योजनेचा उद्देश महिलांचे सक्षमीकरण करणे, त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याला हातभार लावणे आणि त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे हा आहे.

त्वरीत पैसे काढण्याचे कारण लाभार्थी महिला यांना विचारले असता योजनेचा भरवसा नाही, एवढेच उत्तर मिळाले.या गर्दी मुळे बँकेच्या दैनंदिनी कामात व्यत्यय येतो, त्यामुळे हे काम शासन मान्यता असलेल्या ग्राहक सेवा केंद्र यांच्याकडे देण्यात आले असून त्याही ठिकाणी गर्दी दिसून येत असल्याचे चित्र आहे.




# बाहे गावाजवळ बिबट्याचे दर्शन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील बाहे गावाजवळ रोह्यातील स्थानिक नागरिक दैनंदिन काम आटपून खांब येथुन आपल्या घराकडे जात असताना गावाजवळ बिबट्याचे दर्शन झाल्याची घटना घडली असून, या घटनेने ग्रामस्थांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, वनविभाग व स्थानिक प्रशासनाच्या तात्काळ प्रतिसादामुळे परिस्थिती नियंत्रणात आली आहे. ही घटना सर्वप्रथम पोलीस पाटील मनोज तुकाराम थिटे यांच्या निदर्शनास आली.

बाहे येथील मंदार साळवी व बाबू जाधव यांनी रात्री बिबट्या दिसल्याचे सांगून थिटे यांना माहिती दिली. थिटे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व वनविभागाशी संपर्क साधला.यानंतर वनविभाग खांब येथून वनरक्षक अक्षय लाटे व अंकिता भगत हे रात्री सुमारे अकरा ते साडेअकरा वाजेपर्यंत ग्रामस्थांसोबत घटनास्थळी उपस्थित राहून पाहणी करत होते.

अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने घटनास्थळी आढळलेले पावलांचे ठसे तपासले तसेच प्रत्यक्ष दर्शनी पाहिलेली व्यक्तीकडून त्यांनी माहिती घेतली आणि ते बिबट्याचेच असल्याचे



स्पष्ट केले. ठसे गावाच्या वेशीजवळ तसेच शेताच्या कडेला आढळले असल्याचे वनविभागाने सांगितले.

दरम्यान,सागर रेस्क्यू टीम कडून घटनास्थळी येऊन परिस्थितीचा आढावा घेतला. एकट्याने जंगल परिसरात जाऊ नये, जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास वनविभागाशी तात्काळ संपर्क साधावा अशा सूचना देण्यात आल्या.



# रायगडातील वकिलांसाठी ध्यान प्रशिक्षण शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्यातील वकिलांसाठी जिल्हा विधिसेवा प्राधिकारण रायगड - अलिबाग यांनी ४० तासाचे (पाच दिवस) ध्यान प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. त्याचे उदघाटन जिल्हा न्यायाधीश १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माणगाव व ट्रेनर एस. टी. भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले.

रायगड जिल्हा विधिसेवा प्राधिकारणाच्या सचिव श्रीमती. तेजस्विनी निराळे, रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड.प्रसाद पाटील,वकील संघटनेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. अनंत पाटील, सचिव अ‍ॅड. अमित देशमुख, जिल्हा न्यायालयाचे व्यवस्थापाक महेश दायमा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

जिल्हा न्यायाधीश १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माणगाव एस. टी. भालेराव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की , ध्यान केल्यामुळे मन शांत होते. त्याचा फायद वकीलाना वादविवाद सोडवताना होतो. वकिलांनी ध्यान केले पाहिजे. रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रसाद पाटील म्हणाले की, ध्यान केल्यामुळे वादतील पक्षकारांना लवकर वादाचे निराकारण करता येते, त्यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा वाचतोच शिवाय न्यायालयाला जटील प्रकरणात पुरेसा वेळ देतायेतो, न्यायालयावरील प्रकारणांचे ओझे कमी होण्यास मदत होते .

रायगड जिल्हा विधिसेवा प्राधिकारणाच्या सचिव श्रीमती. तेजस्विनी निराळे यांनी प्रस्ताविक केले. या प्रशिक्षण शिबिरात जिल्हा न्यायाधीश, १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माणगाव. एस. टी. भालेराव आणि न्यायाधीश नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई एम. आर .जाधव ध्यानाचे प्रशिक्षण देणार आहेत. या शिबिरात रायगड जिल्ह्यातील ४० वकील सहभागी झाले आहेत. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बार असोसिएशन चे खजिनदार अ‍ॅड. राजेंद्र माळी यांनी केले माणगाव येथील जेष्ठ वकील अ‍ॅड. विनोद घायाळ यांनी आभार मानले.

# तळा शहरातील आठवडा बाजाराला सुरुवात

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरात आठवडा बाजार बुधवारी भरत असून लांबलेल्या व अवकाळी पावसाळ्यानंतर बुधवार ( दि. ५ ) रोजी बाजार भरणे सुरू झाले आहे.या सुरूवातीच्या पहिल्या बाजारात सायंकाळी उशीरा पर्यंत गर्दी पहावयास मिळाली आहे.

यावेळी कांदा, बटाटे पुढे महाग होतील अशी ग्राहकांची समजूत असल्याने कांदा ,बटाटे खरेदीकडे ग्राहकांचा अधिक कल दिसून येत होता.त्यातच भाजीपाल्याचे भाव गगनाला भिडले असल्याने आठवडा बाजारात अनेक भाज्यांचे भाव हे कमी दराने असल्याने ग्राहकांकडून भाजीपालाही मोठ्या प्रमाणात खरेदी केला जात होता.या बाजारात सुकी मच्छी नेहमीच मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असते. सुक्या मच्छीच्या खरेदीसाठी तालुक्यातील ग्राहक आवर्जून येतात.सुरमई, बोंबिल, बारीक सुकट,अंबाडी सुकट,मांदेली,म्हाकल्या, खारे मासे, अशी अनेक जातींची सुकी मच्छी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असल्याने या सुक्या मच्छीला बाजारात मोठी मागणी असते.

तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक बुधवारच्या बाजारात आवर्जुन सुकी मच्छी खरेदी करण्यासाठी येत असतात.याबाबत बाजारातील व्यापाऱ्यांना विचारले असता मागील बाजारापेक्षा यावेळी बाजारात ग्राहक अधिक प्रमाणात खरेदीसाठी येत आहेत.तसेच सर्वच प्रकारचा माल खरेदी करण्याकडे ग्राहकांची ओढा असल्याचे त्यांनी सांगितले.



# आंदोशी-वावे मुख्य रस्त्याला भगदाड; अपघातास निमत्रंण

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील आंदोशी-वावे दरम्यानच्या रस्त्यात मोरीच्या दयनीय अवस्थेने भगदाड पडले असून भगदाड खोलवर व रूंद असल्याने सदर ठिकाण अपघातास निमत्रंण ठरत आहे. वावे ते चौल दरम्यानचा मुख्यः रस्ता वाहतुकीसाठी महत्वाचा आहे, रेवदंडा व वावे ही व्यापारी बाजारपेठ आहे, तर नजीकच उसर येथील गेल इंडिया, खानाव येथील एचपीसिएल कंपनी असल्याने, या ठिकाणाहून सध्यस्थितीत या रस्ताने मोठया संख्येने लहान मोठी वाहने ये-जा करत असतात. हा रस्ता अलिबाग व रोहा या तालुक्याच्या ठिकाणाला जोडला जातो. त्यामुळे वाहतुकीची नेहमीची वर्दळ दिसते. रस्त्यात अवजड वाहतुकीने मुख्य रस्त्यातील मोरी खचली असून, रस्त्यात भला मोठा खड्डा पडून भगदाड पडले आहे.


## जाहीर प्रसिद्धीकरण

- खालील माहीती नमुद केली गेलेल्या बसची विक्री करण्यात येत आहे तर ट्रॅव्हल एजन्सी ह्यानी संपर्क साधावा
- निविदा दिनांक १०/११/२०२५ पर्यंत सोसायटी ई मेल वरती मेल कराव्यात
- MH46AH0704
- मॉडेल सप्टेंबर-२०१६
- डायसल टाटा मार्कपोलो २३ सीटर
- Email :-greenwoodsocietyphase1@gmail.com

सही/- चेअरमन | सही/- सेक्रटरी | सही/- खजिनदार

**ग्रीन वुड इस्टेट फेज- १ को हौं.सो.लि**

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**दरपत्रके मागोवणेकामी**

| अनु. क्र | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | प्रकरण/पमपा/पापुवि/३६२५/ प्र.क्र.१६/११५८ २०२५ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाघऱ्याची वाडी आणि सागाची वाडी येथे पाणी पुरवठा योजना करणे व ओवे तलावातून ओवे कॅम्प व ओवे गावांकरिता पाणीपुरवठा करणे या कामाचे वनक्षेत्र भूसंपादन प्रस्ताव तयार करणे. |

या दर पत्रकाची वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. ०७/११/२०२५ ते दि. १२/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत पाणी पुरवठा विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ www.panvelcorporation.com व पनवेल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५७५/५९६/२०२५**
**दिनांक :- ०६/११/२०२५**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहिर नोटीस

**पनवेल येथील माननीय जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज १०१/२०२५

**निशाणी क्रमांक**

१. श्री. अ‍ॅडवर्ड इग्निशीयस फर्नाडीस — अर्जदार
रा. ४०२ बिनाका को.ऑ हौ.सो.लि.
प्लॉट क्रमांक १७ सेक्टर ८ ई कळंबोली
मुळ पत्ता मु पो आरोंदा घर क्रमांक १४९३
तालुका सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग महाराष्ट्र ४१६५१३

विरुध्द कोणीही नाही

सदरहू अर्जदार यांची पत्नी कै. संताना अ‍ॅडवर्ड फर्नाडीस हे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी गोवा मेडिकल कॉलेज गोवा येथे मयत झाले आहेत. त्यांच्या पश्यात वरील अर्जदार व मुलगी कुमारी शलीन अ‍ॅडवर्ड फर्नांडीस यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद झालेली आहे. सदरहु कै. संताना अ‍ॅडवर्ड फर्नाडीस यांच्या मृत्युसमयी व श्री अ‍ॅडवर्ड इग्निशीयस फर्नाडीस त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे वर्णन येणेप्रमाणे

**मौजे कळंबोली तालुका. पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| बिनाका को. ऑ.हौ.सो.लि. ४०२ | १७ | ८ ई | ४९,२९,०००/- |

अर्जदार यांच्या पत्नी यांचा मृत्यू पावल्याने अर्जदार व त्यांच्या कुटुंबावर दुखाःया डोंगर कोसळला आहे. अर्जदार हे मे. लिबेहर इंडीया प्रा लि, सानपाडा येथिल कंपनीत नोकरीला होते. परंतु सदर कंपनीबाबत सिव्हील कोर्ट काळा घोडा येथे सन २०१७ व २०१८ पासून दावा चालु असल्याने अर्जदार यास कोणतेही ईतर उत्पन्न नाही. अर्जदाराची पत्नी कै. संताना अ‍ॅडवर्ड फर्नांडीस हि दिनांक ०२/०५/२०२१ रोजी दिर्घ आजाराने गोवा मेडिकल कॉलेज गोवा येथे मयत झाली. तशातच अर्जदाराची मुलगी हि सोफिया ज्युनीयर कॉलेज, भुलाभाई देसाई मुंबई येथे शिकत आहे. परंतु अर्जदाराने त्याच्या नातेवाईकाकडून उसणवारीने पैसे घेतले व तिला शिक्षण दिले परंतु शिक्षणचा वाढता खर्च पाहता तो मुलीस पुढील शिक्षण देवु शकत नाही. सबब मुलीस दिनांक ३०/०४/२०२५ रोजी तिचे कॉलेज तिला सोडावे लागले. परंतु अर्जदाराची मुलगी ही तिच्या शिक्षणाच्या महत्वाच्या टप्यावर आली असून व पुढील काळात उच्च्य शिक्षणाकरिताचा वाढता खर्च करणे अर्जदारास अत्यंत आवश्यक झाले आहे.

सबब अर्जदारास तातडीने सदरची सदनिका विकून पुरेशी रक्कम मिळणे आवश्यक झालेले आहे. आणि म्हणून अर्जदार याने मुलीचे पुढील शिक्षणाकरीता व नातेवाईकाकडून उसणवारी परत करण्याकरिता अर्जातील (सदनिका) विक्री करणे आवश्यक झाले आहे. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हे कुमारी शलीन अ‍ॅडवर्ड फर्नांडीस, वय -१७ वर्ष ३ महीने, या अज्ञान बालिकेचे नैसर्गीक वडिल आहेत व या अज्ञान मुलीची नैसर्गिक पालक आहेत.

सबब अर्जदार यांस सदर मिळकतीची विक्री प्रवानगी मिळु नये या संबंधी अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधीत व्यक्तीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात लेखी हरकती स्वतः अगर वकीलांमार्फत सदर मे. न्यायालयात दाखल करावी. सदर नोटीशीच्या मुदतीत अन्या कुणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिध्द झाल्यास या अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे व त्याच्या लाभात वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिलेली आहे.

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**व लिपीक जिल्हा व सत्र न्या. पनवेल**

**सही/-**
**सह. अधिक्षक जिल्हा व सत्र न्या. पनवेल**



## जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-केवाळे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजेः केवाळे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| केवाळे | १. किसन पदू गायकर<br>२. गोटीराम पदू गायकर<br>३. सखाराम पदू गायकर<br>४. सिताराम पदू गायकर<br>५. दिलीप वसंत गायकर<br>६. राजाराम वसंत गायकर<br>७. अनिता वसंत गायकर<br>८. सिताबाई वसंत गायकर<br>९. लता अनंता पालकर<br>१०. विघ्नेश अनंता पालकर<br>११. अंकिता राजेश फडके<br>१२. तुषार अनंता पालकर<br>१३. अक्षता अनंता पालकर<br>१४. राहुल किसन भोपी<br>१५. जागृती धनाजी शेलके<br>१६. निकीता मोतिराम भोईर<br>१७. लक्ष्मी सोपान फडके<br>सर्व रा केवाळे ता. पनवेल जि. रायगड | १८/१/२/५ ८/अ | ०.३५.००<br>०.०३.५०<br>०.३८.५०<br>पैकी विकी क्षेत्र ०.२०.०० | ०.६९ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक: ०७/११/२०२५**

**सही/-**
**अ‍ॅड. चित्तरंजन सुधाकर लाड**

पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६



## जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-खानाव ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजेः खानाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे-खानाव ता. पनवेल | सय्यद जाकीर अली सय्यद इस्माईल अली रा खानाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड | ३३/२/अ | १.१३.९०<br>०.१०.३०<br>१.२४.२०<br>पैकी<br>०.९१.२० | १५.५७<br>पैकी<br>४.५१ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०५/११/२०२५**

**सही/-**
**अ‍ॅड. चित्तरंजन सुधाकर लाड**

पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६

# एपीएमसीला फेरीवाल्यांचा विळखा

## बाजारपेठ परिसरात व्यापारी, वाहनचालकांना कोंडीचा फटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परिसरात अतिक्रमणाचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत आहे. फेरीवाल्यांनी संपूर्ण बाजारपेठ परिसर गिळंकृत केला आहे. भाजीपाला, फळ, धान्य आणि मसाला बाजारांच्या वेशीवर अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात बसू लागल्यामुळे नियमित व्यापाऱ्यांसह वाहनधारकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.



मुंबई एपीएमसी ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. दररोज हजारो शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक येथे व्यवहार करतात, मात्र गेल्या काही महिन्यांपासून रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना आणि बाजार प्रवेशद्वारांवर अनधिकृत फेरीवाल्यांची गर्दी वाढली आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत ही गर्दी सुरू असल्याने या परिसरात वाहतूक कोंडी, कचरा आणि अस्वच्छतेची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाने अनेक वेळा कारवाई केल्याचे सांगितले जाते, परंतु ती केवळ दिखाऊ असते.

काही तासांतच हे फेरीवाले पुन्हा त्याच ठिकाणी येऊन बसतात. फेरीवाल्यांनी बाजाराच्या प्रवेशद्वारावरील मुख्य रस्त्यावर ठाण मांडल्याने रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे एपीएमसी वाहतूक पोलीस स्थानकापासून ते माथाडी भवन आणि माथाडी कामगार पुतळ्यापासून ते जलाराम मार्केट चौकापर्यंत नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामनाही करावा लागत आहे.

**स्थानिकांच्या आरोग्याला धोका**

अनेकदा हे फेरीवाले आपला उरलेला माल रस्त्याच्या कडेला फेकून देत असल्याने एपीएमसी परिसरातील गटारांमध्ये हा सर्व कचरा अडकून राहतो. परिणामी, पावसाळ्यात भाजीपाला व फळ बाजाराच्या प्रवेशद्वारावर पाणी तुंबते. यामुळे परिसरालाही बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. परिसरात अस्वच्छतेमुळे दुर्गंधी वाढून डासांचे प्रमाणही वाढले आहे तर स्थानिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. फेरीवाल्यांसाठी पर्यायी ठिकाणे उपलब्ध करून देऊन बाजार परिसरातून त्यांना हटविण्याची मागणी व्यापारी संघटनांनी केली आहे.

> **फेरीवाल्यांवर प्रशासनाकडून वारंवार कारवाई केली जात आहे, मात्र फेरीवाल्यांची वाढती संख्या आणि प्रशासनाकडे असलेले मर्यादित मनुष्यबळ हा चिंतेचा विषय आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत कारवाई वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पथकाच्या वेळेचे योग्य नियोजन करून शनिवार-रविवारी अधिक कठोरपणे फेरीवाल्यांवर लक्ष ठेवले जाईल अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.**
> **-सागर मोरे,**
> विभाग अधिकारी, तुर्भे विभाग

# नैना प्रकल्पाला गती

## पहिल्या पाच गावांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर 'तिसरी महामुंबई' साकारण्यासाठी आखलेल्या नैना प्रकल्पाला अखेर गती मिळू लागली आहे. सिडको महामंडळाने नव्या नियोजनशैलीतून आणि संवादकेंद्रित दृष्टिकोनातून प्रकल्पाचा पाया पुन्हा दृढ करण्यास सुरुवात केली आहे.

नैना क्षेत्रातील पहिल्या पाच गावांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. नांदगाव, देवद, कुडावे, उसर्ली आणि वडवली या गावांमधील जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ४६ गावांचा समावेश असलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेत शहर नगर नियोजन क्रमांक १ ते १२ सिडकोने जाहीर केली असून, पुढे गावनिहाय संवाद साधून सर्वेक्षण पूर्ण करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या चमूने नवी मुंबई विमानतळ प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर नैना प्रकल्पाकडे पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी या योजनेची जबाबदारी सह-व्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांच्याकडे सोपवली असून, मुख्य नियोजनकार आशुतोष उईके यांच्या समन्वयातून भूमापन, अभियांत्रिकी आणि भूमिअभिलेख विभाग सुसंवादात काम करत आहेत. नांदगावमध्ये सर्वेक्षणानंतर रस्ता मार्किंगचे काम सुरू झाले असून, लवकरच प्रत्यक्ष रस्ते बांधकाम सुरू होणार आहे.

सिडकोने या वेळी नव्या दृष्टिकोनातून गावागावांत जाऊन शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांच्या मालमत्तांचे प्रॉपर्टी कार्ड, गावठाण आणि विस्तारित गावठाणांमधील बांधकामांचे संरक्षण, तसेच पायाभूत सुविधांच्या निविदा प्रक्रियेसंबंधी अनेक वर्षांपासूनची कोंडी यामुळे असलेला अविश्वास आता दूर होत आहे. सर्वेक्षणामुळे २०० मीटर विस्तारातील गावठाण बांधकामांना संरक्षण मिळणार असल्याने गावकऱ्यांचा प्रतिसाद सकारात्मक दिसत आहे.

> **प्रत्येक गावातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सनदशीर मार्गाने सोडवून प्रकल्पाची गती कायम ठेवली जाईल. साधलेल्या संवादामुळे शेतकऱ्यांचे सहकार्य मिळत आहे.**
> **-शांतनू गोयल,**
> सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ

# मंत्री गणेश नाईक ठाण्याचे निवडणूक प्रमुख

## नवी मुंबईची संजीव नाईकांवर जबाबदारी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने निवडणूक प्रमुख आणि जिल्हा निवडणूक प्रभारी नेत्यांची यादी बुधवारी (दि.५) सायंकाळी उशीरा जाहीर केली. ठाणे जिल्ह्यात वनमंत्री गणेश नाईक यांच्यावर निवडणूक प्रभारी पदाची जबाबदारी सोपविली आहे.



विशेष म्हणजे, नवी मुंबईतील नाईकांच्या बालेकिल्ल्यात त्यांचे माजी खासदार पुत्र संजीव यांच्याकडे निवडणूक प्रमुखपद सोपविण्यात आले आहे. राज्यासह ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिकांच्या निवडणूका येत्या दोन महिन्यांत होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने यापैकी नगरपालिका निवडणूकांचे वेळापत्रक मंगळवारी जाहीर केले. या निवडणूका तोंडावर असताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा निवडणूक प्रमुख व जिल्हा निवडणूक प्रभारी यांच्या नियुक्तीची घोषणा बुधवारी सायंकाळी केली.

यामध्ये ठाणे जिल्ह्यातील सात विभागांची जबाबदारी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. यामध्ये ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, भिवंडी, मिरा भाईंदर, नवी मुंबई, कल्याण आणि उल्हासनगर या विभागांचा सामावेश आहे.

नाईक यांच्यावर ही जबाबदारी सोपवित असताना प्रदेशाध्यक्षांनी प्रत्येक विभागासाठी काही निवडणूक प्रमुखही निश्चित केले आहेत.

## ज्वेलर्सच्या दुकानातून सोन्याच्या कड्याची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

सोन्याच्या दुकानातून शेहेचाळीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे लहान बाळाच्या हातातील कडे बुरखा घातलेल्या महिलेने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल शहरातील मलाबार गोल्ड अँड डायमंड रिचेस ज्वेल आर्केड प्रा. लि.मध्ये काळा बुरखा परिधान केलेली महिला लहान बाळाच्या हातातील सोन्याचे कडे घेण्यासाठी आली होती. सेल्समनने तिच्यासमोर कड्यांचा ट्रे ठेवला. यावेळी त्यातून पसंतीचे कडे शोधत असताना हातचलाखी करून ४.७ ग्राम वजनाचे सोन्याचे कडे हातात लपवून ती बुरख्याच्या खिशात घालून चोरी करून निघून गेली. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेरात दिसून आला आहे.

# महिलेची १६ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लग्नाचे आमिष दाखवून कामोठे येथील ४० वर्षीय महिलेची तब्बल १६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात बुधवारी फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार कामोठे येथील सेक्टर १९मध्ये राहणाऱ्या पीडित महिलेने २०१८मध्ये एका मॅट्रिमोनियल कंपनीच्या संकेतस्थळावर त्यांची वैयक्तिक माहिती संकलित केली होती. याच संकेतस्थळावर ४० वर्षीय निलेश निफाडे पाटील याची पीडितेसोबत ओळख झाली. निलेश हा नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शिरवाडे वणी या गावात राहणार आहे.

निलेशने स्वताला ओळख करताना व्यावसायिक असल्याचे सांगून महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने लग्नाचे आश्वासन देत जून २०१८ ते जून २०२२ या काळात पुणे रेल्वे स्टेशन परिसरात वारंवार भेटी घेतल्या. त्यादरम्यान त्याने व्यवसायातील गुंतवणुकीसाठी पैसे लागतील असे सांगून वेळोवेळी १६ लाख रुपये पीडितेकडून घेतले. मात्र, पैसे पुन्हा कधी मिळतील अशी पीडितेने विचारणा केल्यावर आज देतो, उद्या देतो असे सांगून तो टाळाटाळ करत होता. अखेर अनेक महिन्यांचा अनुभवानंतर पीडितेला त्यांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश पगारे यांनी बुधवारी गुन्हा दाखल केला असून तपास सहाय्यक निरीक्षक प्रियांका खरटमल करत आहेत. प्राथमिक चौकशीत गुन्ह्याची सुरूवात पुणे रेल्वे स्टेशन परिसरात झाल्याचे निष्पन्न झाल्याने हा गुन्हा पुढील तपासासाठी पुणे येथील बंडगार्डन पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आल्याची माहिती कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक विमल बिडवे यांनी दिली.

# नवी मुंबई विमानतळावर अपोलो रुग्णालयाकडून २४ तास वैद्यकीय सेवा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे (एनएमआयए) भव्य उदघाटन पंतप्रधानांच्या हस्ते झाल्यानंतर आता प्रवासी सुरक्षा आणि आरोग्य व्यवस्थेची तयारी वेगाने सुरू आहे. विमानतळावरील सुरक्षेसाठी ७ किलोमीटर अंतरावरील अग्निशमन यंत्रणेसोबत आपत्तीवेळी तातडीच्या मदतीसाठी एनएमआयएएलने केलेला करार आणि आता अपोलो रुग्णालयासोबत आरोग्यसेवेचा करार या दोन्ही उपक्रमांमुळे विमानतळ प्रशासनाने प्रवाशांच्या जीवित सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

विमानतळाचे ऑपरेटर नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. (एनएमआयएएल) आणि अपोलो रुग्णालय यांच्यात नुकताच सामंजस्य करार (एमओयू) झाला असून, त्याअंतर्गत विमानतळावर २४ तास कार्यरत राहणारे अत्याधुनिक वैद्यकीय केंद्र सुरू होणार आहे.विमानतळाच्या टर्मिनल १ येथे स्थापन होणारे हे वैद्यकीय केंद्र कामकाज सुरू होण्यापूर्वीच कार्यान्वित होईल. या केंद्रामध्ये आपत्कालीन वैद्यकीय सेवा, अपघात आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक सर्व सुविधा असतील. प्रवासी आणि कर्मचारी यांना तत्काळ आरोग्य सहाय्य मिळावे यासाठी येथे तीन डॉक्टर, आठ नर्सिंग स्टाफ आणि दोन ड्रायव्हर्स अशा प्रशिक्षित टीमची नेमणूक करण्यात आली आहे.



सर्व वैद्यकीय कर्मचारी ॲडव्हान्स्ड कार्डिओव्हस्क्युलर लाइफ सपोर्ट (ACLS) प्रमाणित असतील.प्रवाशांच्या आपत्कालीन उपचारांसाठी विमानतळावर दोन ऑन-साइट अतिदक्षता वैद्यकीय सेवेची उपकरणाने सज्ज असलेली रुग्णवाहिका उपलब्ध असेल. तसेच, ६५ ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर्स (AEDs) टर्मिनल परिसरात धोरणात्मक ठिकाणी बसविण्यात आले आहेत, जे हृदयविकाराच्या झटक्याच्या प्रसंगी त्वरित उपचारासाठी उपयुक्त ठरतील.

एनएमआयएच्या सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेले अपोलो रुग्णालय हे मुंबईतील अत्याधुनिक बहुविशेष रुग्णालय असून, तेथून विमानतळावर वैद्यकीय सहाय्य मिळणार आहे. या करारामुळे एनएमआयए विमानतळावर प्रवाशांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेचा दर्जा अधिक बळकट होण्यासाठी नवी मुंबई महापालिका आणि पनवेल महापालिका तसेच सिडकोच्या अग्निशमन यंत्रणेसोबत आपत्तीवेळी एकमेकांना मदतीचा करार केला आहे.

# सोसायट्यांसाठी पुनर्विकास मार्गदर्शन परिसंवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत 'सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकास व सहकार कायदेविषयक मार्गदर्शन' या विषयावर दोन दिवसांचा परिसंवाद व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. वाशी सेक्टर ३ येथील महत्आमे ज्योतिबा फुले सभागृहात शुक्रवारी (दि.७) सकाळी१०.३० वाजता या उपक्रमाचे उद्घाटन होणार आहे. तर उद्या ८ रोजी कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

युनिट्रॅक मीडिया,मुंबई यांच्यावतीने गृहनिर्माण क्षेत्राशी संबंधित विविध सेवा पुरवठादारांचे प्रदर्शन आयोजिन करण्यात आले आहे. तर नवी मुंबई को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लि. यांच्या वतीने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास व सहकार कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याते विविध विषयावर दोन दिवसांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गृहनिर्माण व पुनर्विकास क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. नवी मुंबईतील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी या परिसंवादाचा व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई को.ऑप. हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सुनील चौधरी व सचिव भास्कर म्हात्रे यांनी केले आहे.

# ११ नोव्हेंबरला पेन्शन अदालत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार, ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी १२ वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शनविषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग प्र.तहसिलदार, (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# मनरेगा योजनेसाठी फेस ई-केवायसीची सक्ती

**खारघर : प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) पारदर्शकता आणि प्रामाणिकता राखण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. योजनेंतर्गत काम करणाऱ्या सर्व मजुरांसाठी आता 'फेस ई-केवायसी' प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे प्रत्येक मजुराची ओळख आधार क्रमांक व चेहरा प्रमाणीकरणाद्वारे निश्चित होणार असून, त्यामुळे बनावट नोंदी आणि गैरव्यवहारांना आळा बसणार आहे.

मनरेगा'त फेस ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. मजुरांची ओळख आता आधार क्रमांक आणि चेहरा प्रमाणीकरणाद्वारे निश्चित केली जाणार असून, यामुळे बनावट उपस्थिती आणि गैरव्यवहारांना आळा बसणार आहे.

नवी फेस ई-केवायसी यंत्रणा मजुरांची उपस्थिती चेहरा स्कॅनिंगद्वारे नोंदवेल. मजुरांचा आधार क्रमांक प्रणालीशी जोडून त्यांची ओळख निश्चित केली जाईल आणि उपस्थितीची माहिती थेट ऑनलाइन पोर्टलवर अपलोड होईल.

मनरेगा मजुरांना आता ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून फोटो स्कॅनिंग करावे लागणार आहे. यासाठी आधार क्रमांक, जॉबकार्ड क्रमांक आणि चेहरा प्रमाणीकरण आवश्यक असून, त्यानंतरच मजुरांची उपस्थिती नोंदवली जाणार आहे.



ई-केवायसी प्रक्रिया संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामार्फत पूर्ण करता येणार आहे. मनरेगा मजुरांनी आपल्या ग्रामपंचायतीत जाऊन आधार क्रमांक, जॉबकार्ड क्रमांक आणि बायोमेट्रिक माहिती नोंदवावी लागेल. त्यानंतर फेस स्कॅनिंगद्वारे ओळख पडताळणी केली जाईल.

नव्या फेस ई-केवायसी पद्धतीने हजेरी नोंदवल्याने मजुरांची उपस्थिती अचूक राहील, बनावट नोंदींना आळा बसेल आणि देयक प्रक्रिया वेगवान होईल. त्यामुळे मनरेगाचे कामकाज अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे-बोगस मजूर व पूर्वी हजेरीचे प्रकार आता बंद होणार आहत.

आता मनरेगामध्ये मजुरांचा फोटो आधार डेटाशी जुळल्यानंतरच हजेरीपत्रक तयार होणार आहे. त्यामुळे फक्त अधिकृत आणि ओळख सत्यापित मजुरांचीच उपस्थिती नोंदवली जाईल. या नव्या प्रणालीमुळे काही अडचणीही कायम आहेत. ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी इंटरनेट सुविधा मर्यादित असल्याने फेस स्कॅनिंग आणि डेटा अपलोड करताना विलंब होतो.

## पाले गावात आई भवानी मातेच्या मंदिरासाठी साउंड सिस्टीम भेट

**उरण : बातमीदार**

पाले गावात आई भवानी मातेच्या मंदिरात ग्रीन प्रॉपर्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून या कंपनीचे मालक जय सोनी, भूषण खैरनार यांच्या माध्यमातून अनिल पाटील यांच्या सहकार्याने आई भवानी मातेच्या मंदिरात साऊंड सिस्टमचे भेट देण्यात आले. या वेळी ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

हनुमान म्हात्रे, बलदिन म्हात्रे, अतिश म्हात्रे, उमेश पाटील, गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, नितेश गावंड, चंद्रकांत म्हात्रे, माजी सरपंच वैभवी म्हात्रे, योजना म्हात्रे, माधुरी म्हात्रे, पार्वती म्हात्रे, संगीता म्हात्रे, रामकृष्ण म्हात्रे, हर्षल म्हात्रे, मीत म्हात्रे आदी उपस्थित होते.



## गरजू मुलाला उपचारासाठी मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वळवली गावात राहणाऱ्या गरीब कुटुंबातील १२ वर्षीय मुलाच्या छातीतील वॉलचे ऑपरेशन नुकतेच करण्यात आले. यासाठी श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्याकडून ऑपरेशनसाठी मदत करण्यात आली.

वळवली येथे राहणारे सदानंद सिंग यांचा १२ वर्षीय मुलगा विवेकानंद सिंग याला जन्मापासून हृदयाचा प्रॉब्लेम होता. या वेळी तो पाच वर्षांचा असताना त्याच्या हृदयाचे ऑपरेशन करण्यात आले, मात्र बसवण्यात आलेला हृदयाचा वाल लहान असल्याने




पुन्हा ऑपरेशन करावे लागेल असे सांगण्यात आले. त्यानंतर बारा वर्षीय मुलगा विवेकानंद सिंग याच्या ऑपरेशनसाठी सदानंद सिंग यांच्याकडे पैसे नव्हते. खर्च लाखात असल्याने आणि सदानंद सिंग यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी मदतीसाठी शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख भरत ज्ञानदेव जाधव यांची भेट घेतली.


या वेळी भरत जाधव यांनी ठाणे, टेंभी नाका येथील शिवसेना कार्यालय वैद्यकीय मदत कक्षाचे विलास काळन यांची भेट घेऊन त्यांना मदत करण्यासाठी कळवले. या वेळी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्याकडून विवेकानंद सिंग या मुलाच्या ऑपरेशनसाठी मदत करण्यात आली. या मुलावर हिरानंदानी हॉस्पिटल, पवई येथे यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली. याबद्दल सदानंद सिंग यांनी श्रीकांत शिंदे फाउंडेशन, विलास काळन, भरत जाधव यांचे आभार मानले आहेत.

# सुधागडात रास्तभाव दुकानातील धान्यात जिवंत अळ्या आणि लेंड्या

**पाली : प्रतिनिधी**

शासनामार्फत रास्त भाव धान्य दुकानांतून देण्यात येणाऱ्या धान्यावर आदिवासी व गोरगरीब सर्वसामान्य जनतेचे पोट भरते, मात्र तेच धान्य आता या नागरिकांसाठी जीवघेणे ठरत आहे. सुधागड तालुक्यातील वाघोशी विभागातील रास्त भाव धान्य दुकानातून मिळणाऱ्या धान्यात चक्क जिवंत अळ्या आणि उंदीर व पालीच्या लेंड्या सापडल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकाराने सुधागड तालुक्यातील जनतेतून संताप व तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.





वाघोशी विभागातील रास्त भाव धान्याचे दुकान कुंभारघर येथे आहे. या विभागात विशेषतः बहुतांश प्रमाणात आदिवासी वस्त्या आहेत. आणि या आदिवासी नागरिकांचे जगण्याचे एकमेव साधन म्हणजे शासनाकडून रास्तभाव धान्य दुकानावर मिळणार शिधा आहे, मात्र रास्त भाव धान्य दुकानदाराकडून नागरिकांना अक्षरशः अळ्या व लेंडीयुक्त धान्य वितरित करण्यात येत असल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे. काही आदिवासी वृद्ध महिला रेशनिंग चा शिधा घरी घेऊन आल्यानंतर त्या धान्यात जिवंत अळ्या व लेंड्या असल्याचे निदर्शनास आले.

डोळ्यांनी कमी दिसू येणाऱ्या वृद्ध आदिवासी महिलांनी हे धान्य शिजवून आपल्या कुटुंबासहीत खाल्ले असते तर त्यांना अनेक आजारांना बळी पडावे लागले असते. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व ऑल इंडिया पॅन्थरचे नरेश गायकवाड यांनी ही बाब सुधागड तहसीलदार व पुरवठा निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून दिली याबाबत नरेश गायकवाड यांना तहसील कार्यालयाच्या आवारात याविरोधात आंदोलनदेखील केले.

### तहसीलदारांनी योग्य कारवाई करावी

*शासनाकडून मिळणारे रेशनिंगचे धान्य निकृष्ट दर्जाचे किंवा खराब असेल तर ते रेशनिंग दुकानदाराने वितरित करू नये. असे धान्य आल्यास ते परत करावे. नागरिकांना चांगले व दर्जे दार धान्य देणे हे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे असे खराब धान्य रेशनिंग दुकानदार वितरित करीत असेल तर ते चुकीचे आहे. याबाबत संबंधित तहसीलदार यांनी योग्य ती कार्यवाही करावी अशी माहिती या रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वीय सहाय्यक (एडीएसओ) दिपाली ब्राम्हणकर यांनी दिली.*

# एसटीने मोटरसायकलला कट मारल्याने एक ठार; गुन्हा दाखल

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे एसटी स्टॅन्डकडून पेण येथे जात असलेली पाली–पेण एसटी जेव्हा नागोठणे कोळीवाडा प्रवेशाजवळ आली त्यावेळी कोळीवाड्याकडून नागोठणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात जात असलेली युनिकॉन मोटरसायकलला एसटीने कट मारल्याने मोटारसायकलस्वाराच्या मागे बसलेले शांताराम दामा गायकवाड (वय ७२, मुळ राहणार देऊळवाडा पाली ता. सुधागड व सध्या राहणार चंदनवाडी ठाणे) हे मोटरसायकलवरून खाली जमिनीवर पडल्याने शांताराम गायकवाड यांच्या डोक्याला जबरी दुखापत झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ५) दुपारी १ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत मयत शांताराम गायकवाड यांचे सुपुत्र शेखर गायकवाड (वय ३५) यांनी नागोठणे पोलीस स्टेशनला फिर्याद दिली असून पोलिसांनी एस. टी. चालकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पुढील तपास पो. हा. महेश रुईकर हे पोलीस अधिकारी सहा. पो. नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.



याबाबत नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार पाली ते पेण एस. टी. चालक एस. टी. (एम.एच. २०/ बी.एल. ३२३९) नागोठणे ते रिलायन्स चौक अशी चालवीत घेऊन जात असताना नागोठणे कोळीवाडा जवळील सलीम मटण वाल्याच्या दुकाना समोर एसटी आली त्याचवेळी समोरून येणाऱ्या युनिकॉन मोटार सायकल (एमएच ०६ सीए ४१४९) हिस कट मारल्याने मोटार सायकल वर मागील बाजूस बसलेले शांताराम गायकवाड हे मोटरसायकलवरून खाली जमिनीवर पडून त्यांच्या डोक्याला जबर दुखापत होऊन मयत झाले.

दरम्यान, अपघाताची खबर न देता एसटी चालक पळून गेला म्हणून नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चौल येथे स्पाईस रेस्टॉरंन्टतर्फे रक्तदान शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्पाईस रेस्टॉरंन्ट आयोजीत रक्तदान शिबिरास रक्तदात्याचा मोठा प्रतिसाद लाभला. या रक्तदान शिबिरास युवावर्गासह महिलावर्गानी सुध्दा रक्तदान केले, तर संदेश बेडेकर यांनी ९९ वेळा रक्तदान करण्याचा बहूमान घेतला.

चौल येथे स्पाईस रेस्टॉरंन्टच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ चे दरम्यान करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरावेळी चौल ग्रा.प. माजी उपसरपंच अजीत गुरव, मारूती भगत, अशोक नाईक, शैलेश घरत, राजेंद्र गुरव, दिपेश पाटील, अमित मानकर, अमोल कंटक, अक्षय



नाईक, संदेश गायकर, कल्पेश खारकर, संदेश बेडेकर, विजय भोसले, ओमकार नागावकर आदी मंडळीची उपस्थिती होती.

या रक्तदान शिबीराचा प्रारंभ शिवसेना उध्दव ठाकरे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांचे शिवप्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून व दिपप्रज्वलनाने करण्यात आला. या वेळी मोठया संख्येने युवावर्ग तसेच महिलावर्गाने रक्तदान करून प्रतिसाद दिला. तर संदेश बेडेकर यांनी ९९ व्यांदा रक्तदान केले. या वेळी स्पाईस रेस्टॉरंटचे केदार मळेकर व सिध्दी मळेकर यांचे वतीने सुरेंद्र म्हात्रे, अजीत गुरव, मारूती भगत, संदेश बेडेकर, अशोक नाईक, आदीचा पुष्पगुच्छ प्रदान करून यथोचीत सत्कार केला. तसेच मान्यवरांचे हस्ते रक्तदात्याना पुष्पगूच्छ प्रदान करून त्यांना रक्तदानाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी जिल्हा शासकीय रक्तपेढीच्या वतीने रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी, समाजसेवा अधिक्षक नवनाथ अक्की, अधिपारिचारक वैभव कांबळी, विशाल भगत, रामकुमार निकस, गणेश भोये, मंगेश पिंगळा, महेश घाडगे यांनी विशेष परिश्रम घेतले. तर जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे यांनी स्पाईस रेस्टॉरंन्टचे केदार मळेकर व सिध्दी मळेकर तसेच मित्रवर्ग यांनी रक्तदानासारखे स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल कौतूक मनोगतात व्यक्त केले.

# 'वयानुसार ज्येष्ठ नागरिकांनी संयम, सकारात्मकता आणि मित्र जोडावे'

**रोहे : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस आपले वय वाढत आहे. आपण जिवंत असे पर्यंत संयम बाळगा, सकारात्मकता आणि जास्तीतजास्त मित्र जोडा म्हणजे आपला एकाकीपणा दूर होईल आणि आपला उत्साह निश्चितच वाढेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक मंडळ रोहाचे अध्यक्ष पी. बी. सरफळे यांनी ज्येष्ठ मंडळाच्या सभेत केले.

या वेळी ज्येष्ठ मंडळाचे उपाध्यक्ष एस. एन. गायकवाड, सचिव सुरेश मोरे, पदाधिकारी शैलजा देसाई, अनुराधा धुमाळ, मंगेश जोशी, शरद गुढेकर, नंदकुमार भादेकर, दिलीप शेवाळे, सुरेश मेहता, महंमद डबीर आणि शेकडो सभासद भगिनी उपस्थित होत्या.

सरफळे पुढे म्हणाले आपण एकत्र जमतो तेव्हा विचारांची देवाण घेवाण होते. समस्या एकमेकांना शेअर केल्यावर प्रश्न सुटतात. आपल्या जेष्ठ नागरिकांसाठी असणाऱ्या ज्या योजना आहेत त्याचा लाभ घ्या. आणि आपल्या सदस्यांना मिळवून देण्यासाठी मदत करा.



या वेळी ज्येष्ठ नागरिक महंमद डबीर यांनी सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. मी दोन वेळा आमच्या समाजाचा अध्यक्ष होतो. या ठिकाणी आल्यावर मित्र मंडळी भगिनी सदस्या भेटतात. आपले विचार मांडतात. तसेच आमचे विचारदेखील ऐकून घेतात त्यात एक प्रकारचा आनंद आहे. मन प्रफुल्लित होते. ऊर्जा मिळते. यावेळी लायन्स क्लब तर्फे जेष्ठनागरिकांना स्टीक (काठ्या) देणार असल्याचे सांगण्यात आले. ज्यांचे वाढदिवस होते त्यांना श्रीफळ, सन्मानपत्र आणि गुलाब पुष्प प्रदान करून त्यांना यथोचित सत्कार अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले.

मंडळाचे कार्यपाहून दत्ताराम तवटे, आनंद झारखंडे व शैलजा झारखंडे यांनी प्रवेश घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन सचिव सुरेश मोरे यांनी केले तर उपाध्यक्ष एस. एन. गायकवाड यांनी आभार मानले. कार्यक्रमला १००हुन अधिक ज्येष्ठ नागरिक बंधू भगिनी उपस्थित होते.

# वावंढळवाडी येथे काकड आरतीची सांगता

**चौक : प्रतिनिधी**

जीवन सार्थकी लावण्यासाठी काकड आरती करण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन थोर कीर्तनकार हभप संदीपमहाराज यादव यांनी केले. वावंढळवाडी येथे कोजागिरी पौर्णिमेला सुरू झालेल्या काकड आरतीची सांगता दीपोत्सव कार्यक्रमाने त्रिपुरा पौर्णिमा दिवशी करण्यात आली, त्या वेळी ज्येष्ठ कीर्तनकार संदीप महाराज बोलत होते.

पत्रकार अर्जुन कदम, हभप रमेश महाडिक, हभप. अरुण गायकवाड, हभप भद्रिके, हभप निकम व अन्य अन्य मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कोजागिरी पौर्णिमेच्या पहाटे पासून ते त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटे मंदिरात देवाला जाग करण्यासाठी काकड आरती करण्याची शेकडो वर्षांची प्रथा आहे. काकडयाने देवाला ओवाळले जाते आणि त्यानंतर विविध भजने, स्तोत्रे म्हटली जातात. उपासनेचा एक मार्ग आहे, ज्यातून परमार्थ कसा साधावा हे शिकता येते. या वेळी पंचक्रोशीतील वारकरी संप्रदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

वैकुंठवाशी हभप लहू महाराज यांनी सुरू केलेल्या काकडा आरतीची परंपरा हभप कमलाकर काइनकर, युवा नेतृत्व रामदास काईनकर आणि त्यांच्या सहकारी यांनी काकडा आरती महिनाभर आणि सांगता यशस्वी केली.

या दीपोत्सव कार्यक्रमास हभप रमेशमहाराज महाडिक, हभप अरुणमहाराज गायकवाड, महिला कीर्तनकार योगिता पंदेकर, हभप दामू पालांडे, तानाजी ठोंबरे, खंडागळे, माजी सरपंच दीपक पंदेकर, निकम, माजी उपसरपंच ललिता रामदास काईनकर यांच्यासह वारकरी संप्रदाय उपस्थित होते.

# मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान नागोठणे येथे युवा सामाजिक कार्यकर्ते सद्दाम दफेदार, रमीज दफेदार व फझल दफेदार यांच्या सौजन्याने त्यांचे वडील नागोठणेचे माजी सरपंच मरहुम फरमान दफेदार यांच्या स्मरणार्थ तसेच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल नवीन पनवेल यांच्या सहकार्याने मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये एकूण ५२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली त्यामध्ये १७ मोतिबिंदू रुग्णआढळले असून त्यांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे पाठविण्यात आले असल्याची माहिती एमजेएफ विवेक सुभेकर यांनी दिली. दरम्यान, मरहुम फरमान दफेदार हे दानशूर व दिलदार व्यक्तिमत्व होते तसेच ते गरीब गरजू लोकांचे



तारणहारदेखील होते असे कौतुक उपस्थित मान्यवरांनी केले.

या शिबिरावेळी नागोठणे उपसरपंच अकलाख पानसरे, माजी सरपंच लियाकत कडवेकर, शब्बीर पानसरे, अशपाक पानसरे, सिराज पानसरे, असिफ मुल्ला, सद्दाम दफेदार, रमीज दफेदार, फजल दफेदार, झोन चेअरमन एमजेएफ विवेक सुभेकर, डिस्ट्रीक्ट चेअरमन शिक्षण एमजेएफ यशवंत चित्रे, एमजेएफ सुधाकर जवके, चार्टड प्रेसिडेंट प्रकाश जैन, विलास चौलकर, दौलतराम मोदी, सुनील कुथे, विजय शहासने, विनोद सावंत, विशाल शिंदे, सुजाता जवके, दिपक लोणारी यांच्यासह शंकरा आय हॉस्पीटलचे डॉ. सलोनी सुभेकर, कॅम्प को ऑर्डीनेटर ज्योती पाटील, असिस्टंट नेहा कदम यांच्यासह मोठ्या प्रमाणावर या सेवेचा लाभ घेणारे नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संपुर्ण सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी केले. यावेळी लायन्स क्लबसाठी सद्दाम दफेदार यांनी २१ हजार रुपये देणगी दिली तसेच नागोठणे माजी सरपंच लियाकतशेठ कडवेकर यांनी २५ खुर्च्या देण्याचे जाहीर केले. दरम्यान सद्दाम दफेदार यांनी जनसेवेसाठी लायन्स क्लब सदस्य होण्याची विनंती लायन्स क्लब पदाधिकारी यांना केल्यानंतर चार्टड प्रेसिडेंट प्रकाश जैन यांनी तत्काळ सद्दाम दफेदार यांची लायन्स क्लब सदस्यपदी नियुक्ती झाल्याचे जाहीर केले.

# श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान उद्धर येथे स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान, उद्धर येथे नवीन स्वच्छता गृहाचे लोकार्पण सोहळा उत्साहात झाला. या देवस्थानाला दररोज जिल्हाभरातून शेकडो भक्त दशक्रिया विधीसाठी येतात. साधारणतः २०० ते ५०० नागरिक दररोज या पवित्र स्थळी उपस्थित राहतात.

या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेले नवीन स्वच्छता गृह हे भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, स्वच्छता आणि सुविधा या दोन्ही बाबतीत हा उपक्रम आदर्श ठरणार आहे. भाविकांनी या उपक्रमाचे मनः पूर्वक स्वागत करत देवस्थान पंच समितीचे आभार व्यक्त केले.

लोकार्पण सोहळ्यास उद्धर गावातील ग्रामस्थ, भक्तगण तसेच पंच समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी परिसरात उत्साहवर्धक आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उद्धर देवस्थान समितीच्या या उपक्रमामुळे भाविकांना दिलासा मिळत असून, 'स्वच्छ मंदिर, सुंदर परिसर' या संकल्पनेला चालना मिळाली आहे.



# एकतेच्या परेडमध्ये पोलीस अधिकारी सविता गर्जे यांचे पराक्रमी नेतृत्व

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

स्वातंत्र्योत्तर भारताचे पहिले गृहमंत्री व लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त गुजरातमधील केवडिया येथे भव्य राष्ट्रीय एकता दिवस परेड पार पडली. या ऐतिहासिक क्षणी महाराष्ट्र पोलीस दलाचे नेतृत्व रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता मारुती गर्जे यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि कौशल्यपूर्णरीत्या पार पाडले.

देशाचे पंतप्रधान सन्माननीय नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या राष्ट्रीय सोहळ्यात विविध केंद्रीय सुरक्षा दल, राज्य



पोलीस दल आणि सशस्त्र पथकांनी एकतेचा, देशभक्तीचा आणि सशक्त भारताचा संदेश दिला. महाराष्ट्र पोलीस दलाच्या तुकडीचे नेतृत्व करताना गर्जे यांनी दिलेली सलामी आणि परेडमधील धडाडीचे नेतृत्व संपूर्ण व्यासपीठावर दाद मिळवणारे ठरले.

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्याचा प्रत्यय देत, महाराष्ट्र पोलीस दलाने शिस्त, सामर्थ्य आणि एकात्मतेचे उत्तम प्रदर्शन केले. गर्जे यांच्या प्रभावी उपस्थितीने आणि नेतृत्वाने महाराष्ट्राची ओळख केवडियाच्या भूमीवर अधिक तेजस्वी केली.

रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा हा क्षण ठरला असून, जिल्ह्यात अभिमान आणि प्रेरणेची भावना ओसंडून वाहते आहे. महिला अधिकाऱ्यांनी दाखवलेले हे नेतृत्व पोलीस दलातील नवतरुणांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरेल, अशी भावना वरिष्ठ अधिकारी आणि नागरिकांनी व्यक्त केली.

# रोह्यात तांदळाने भरलेल्या ६९१ गोणी जळून खाक वृत्त तथ्यहीन

## तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांची माहिती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भुवनेश्वर परिसरात रविवारी रात्री धान्याच्या ट्रकला लागलेली आग, रोह्यात तांदळाने भरलेल्या ६९१ गोणी जळून खाक या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. दिवाळीत सरकारी धान्य वाटप करण्यासाठी सरकारी गोदामातून धान्य घेऊन जाणाऱ्या ट्रकला आग लागून तांदळाच्या ६९१ गाणी जळून खाक झाल्या. यात ३४५ क्विंटल तांदूळ होता. रविवारी मध्यरात्री १२:३० वाजता भुवनेश्वर गाव परिसरातील शासकीय गोदामाच्या आवारात घडली.

आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. भुवनेश्वर येथे शासकीय गोदामाच्या आवारात धान्याने भरलेला ट्रक उभा होता. दिवाळीच्या सुट्टीत चालक गावी गेला होता. रविवारी मध्यरात्री अचानक ट्रकला आग लागली. घटनेनंतर नायब तहसिलदार राजेश थोरे यांच्या समवेत संबंधित खात्याच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर धाटाव एमआयडीसी येथील अग्निशमन दलाला पाचारण केले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले, असे बातमीपत्रात नमूद केले आहे.

या बातमीबाबत तहसिलदार रोहा डॉ. किशोर देशमुख यांनी वस्तुस्थितीदर्शक खुलासा केला आहे की, रोहा तालुक्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना दुकानांना भुवनेश्वर–रोहा येथील शासकीय धान्य गोदामातून धान्य पोहोच करण्यात येते. याकरिता भारतीय खाद्य निगम (FCI) डेपो, कळंबोली, ता.पनवेल शासकीय गोदामात धान्याची वाहतूक करण्यात येत असते. एफसीआय, कळंबोली येथून आलेली तांदळाची गाडी (वाहन क्र. एम.एच. ०४ के.यू. ४५८८) भुवनेश्वर गोदाम परिसरात उभी असताना दि.२० ऑक्टोबर, २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास वाहनाने पेट घेतली. या वाहनामध्ये एकूण ६९१ गोणी (३४५.४४ क्विंटल) शासन तांदूळ धान्य भरलेले होते.

आग लागल्याच्या वेळी वाहनचालक घटनास्थळी उपस्थित नव्हते. घटनेची माहिती मिळताच संबंधित कर्मचारी, गोदामातील हमाल यांना घटनास्थळी पाठवण्यात आले. तसेच आगीची माहिती अग्निशमन दलास देण्यात आली. संबंधीत कर्मचारी, स्थानिक नागरीक व अग्निशमन दलाच्या मदतीने आग तात्काळ आटोक्यात आणण्यात आली. आग विझल्यानंतर, उपस्थित रोहा गोदाम कर्मचारी व गोदामातील हमालांच्या सहाय्याने तात्काळ सदर वाहनातील धान्य गोदामात उतरविण्यात आले.

या आगीमध्ये वाहनातील एकूण ४५ गोण्यांची बारदाने अंशतः जळालेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. त्या गोण्यांतील तांदूळ चाळून, साफ केल्यानंतर तांदळाचे एकूण ६८७ गोणी (वजन ३४३.४४ क्विंटल धान्य) गोदामात थप्पीमध्ये साठविण्यात आले असून हे धान्य रास्तभाव दुकानात वितरण करण्याची तजवीज ठेवली आहे. वाहनातील एकूण गोण्यांच्या तुलनेत ४ गोणी (२.००क्विंटल) तांदळाची घट आढळले आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

या प्रकरणी सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयासही सादर करण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार डॉ.किशोर देशमुख यांनी दिली आहे.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

## टी-२० मालिकेत आघाडी




**गोलकोस्ट : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने चौथ्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ४८ धावांनी विजय मिळवला. भारताच्या गोलंदाजांनी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. टीम इंडियाच्या प्रत्येक गोलंदाजाने सामन्यात विकेट घेत ऑस्ट्रेलियाला बॅकफूटवर टाकले. यासह भारतीय संघाने मालिकेत २-१ अशी आघाडी मिळवली आहे.

भारताने दिलेल्या १६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरूवात चांगली झाली, पण अक्षर पटेलच्या विकेट्समुळे भारताने पुनरागमन केले. मॅथ्यू शॉर्टला २५ धावांवर अक्षरने पायचीत केले, तर कर्णधार मिचेल मार्श ३० धावा करत बाद झाला. यानंतर जोश इंग्लिस १२, टीम डेव्हिड १४, जोश फिलिपी १० आणि मार्कस स्टॉयनिस १७ धावा करत बाद झाले, तर मॅक्सवेल २, द्वारशुईस ४ आणि बार्टलेट शून्यावर बाद झाले. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक तीन, अक्षर पटेल व शिवम दुबे यांनी प्रत्येकी दोन, तर अर्शदीप सिंग, वरूण चक्रवर्ती व जसप्रीत बुमराहने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केले. अभिषेक शर्मा चांगल्या सुरुवातीनंतर मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. त्याने २१ चेंडूत तीन चौकार व एका षटकारासह २८ धावा केल्या. शुबमन गिलने ३९ चेंडूत ४६ धावांची खेळी करत बाद झाला. शिवम दुबे या सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर उतरला होता आणि त्याने २२ धावांची खेळी केली. यानंतर सूर्यकुमार यादवने १० चेंडूत २० धावा केल्या, पण तो मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला.

मग तिलक वर्मा, जितेश शर्मा अनुक्रमे ५ आणि ३ धावा करत बाद झाले. वॉशिंग्टनही १२ धावा करून माघारी परतला. अक्षर पटेलने या सामन्यात २१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, ज्यामुळे संघ ८ बाद १६७ धावा करण्यात यशस्वी ठरला. ऑस्ट्रेलियाकडून नॅथन एलिस व झाम्पाने प्रत्येकी तीन, तर बार्टलेट व स्टॉयनिस यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.



## विश्वविजेत्या भारतीय संघाकडून पंतप्रधान मोदींना खास जर्सी भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विश्वविजेतपदाची ट्रॉफी घेऊन भारतीय महिला क्रिकेट संघातील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफने बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सरकारी निवासस्थानी भेट घेतली. मोठ्या थाटामाटात विश्वविजेत्या संघातील सर्व सदस्यांचे स्वागत करण्यात आले.

भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने विश्वचषकाची ट्रॉफी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हाती दिली. मग सर्व खेळाडू आणि सपोर्ट स्टाफशी पंतप्रधानांशी गप्पा गोष्टीही केल्या. या खास भेटीत भारतीय संघाकडून पंतप्रधानांना नंबर वन नमो असे लिहिलेली जर्सी देण्यात आली. ही जर्सी विश्वविजेत्या लेकींच्या स्वाक्षरीने सजलेली होती.

कर्णधार हरमनप्रीत कौरने या वेळी जुन्या आठवणींनाही उजाळा दिला. २०१७च्या वर्ल्डकप स्पर्धेत मिताली राजच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला इंग्लंडविरुद्धच्या फायनलमध्ये नऊ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला होता. हरमनप्रीत या संघाचा भाग होती. त्या वेळीही भारतीय संघाने पंतप्रधान मोदींची भेट घेतली होती.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या समर्थची राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी निवड



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी समर्थ महेंद्र म्हात्रे याची राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद, रायगड ज्युडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विभागीय शालेय ज्युडो स्पर्धा २०२५-२६चे आयोजन पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे आयोजन करण्यात आले होते. यात समर्थने घवघवीत यश प्राप्त केले असून त्याची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळ संचालक संजय भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी समर्थचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## मुंबई, रत्नागिरी, नंदुरबार, लातूर, पुणे संघांची आगेकूच

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबईशहर पश्चिम, रत्नागिरी, नंदूरबार, यांची किशोरी तर लातूर नंदुरबार व पुणे शहर यांची किशोर गटात आगेकुच

मुंबई शहर पश्चिम, रत्नागिरी, नंदूरबार यांची किशोरी; तर लातूर नंदुरबार व पुणे शहर यांची ३६व्या किशोर किशोर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत आपआपल्या गटात आगेकुच सुरू ठेवली आहे.



पिंपरी चिंचवडमधील बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत कै. राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान संघ व विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या वतीन आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात झालेल्या सामन्यात किशोरी विभागात ह गटात मुंबई शहर पश्चिम संघाने मुंबई उपनगर पूर्व संघाचा ५७-२१ असा सहज पराभव केला. आक्रमक पवित्रा घेत मुंबई शहर पश्चिम संघाने विश्रांतीपूर्वी दोन लोन देत २५-९ अशी भक्कम आघाडी घेतली. विश्रांतीनंतरही संघाने आक्रमण सुरू ठेवत आपल्या गुणांचे अर्धशतक पूर्ण केले. मुंबई शहरच्या पायल कांचन, श्रृतीका शिंदे यांच्या आक्रमणाला उपनगरकडे तोड नव्हती. उपनगरच्या सई ताम्हाणेकर हिने काही पकडी घेत मुंबईला थोडाफार प्रतिकार केला. किशोरी ब गटात नंदुरबारने बीड संघाचा ६३-२९ असा फडशा पाडला. विश्रांतीलाच ३२-९ अशी आघाडी घेणाऱ्या नंदुरबारने आपल्या आक्रमणाची धार कायम राखत ३४ गुणाच्या मोठ्या फरकाने सामना आपल्या बाजुला झुकविला. वैष्णवी देवकाते, अनुष्का झेंडे यांच्या अष्टपैलू खेळाला या विजयाचे श्रेय जाते. बीडची प्रतीक्षा जाधव चमकली.

किशोर विभागात अत्यंत चुरशीच्या झालेल्या ग गटात लातूरने बलाढ्य अशा मुंबई उपनगर पश्चिमला ५२-४९ असे चकविले. विश्रांतीपूर्वी ३०-२० अशी आघाडी घेणाऱ्या लातुरला नंतर मात्र मुबंई उपनगरने विजयासाठी चांगलेच झुंजविले. रूद्र सारोळ, रितेश चव्हाण, आदित्य बने लातूरकडून, तर स्वरूप बाईत, संदीप विश्वकर्मा, उमाशंकर वर्मा उपनगरकडून उत्कृष्ट खेळले.

नंदुरबारने मुंबई शहर पश्चिम संघाला ह गटात ५३-२९ असे नमवित आगेकुच केली. सुदर्शन अडकित्ते, निलेश पाटील यांच्या झंजावाती चढाया व संभव बनकर, शंतनु महसके यांच्या पकडी यामुळे नंदुरबारला हा विजय सोपा गेला. मुंबई शहर पश्चिम कडून आयुष कनोजिया, जैयस्वर संतराम, जयकिशन चौहान यांनी बऱ्यापैकी प्रतिकार केला.

ब गटात पुणे शहर संघाने सोलापूर संघाचा ५३-२६ असा पाडाव केला. कार्तिक तरडे व श्रेयश सुरवसे यांनी या विजयात उत्कृष्ट खेळ केला. सोलापूरचा अथर्व सोनार चमकला.



## जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत फुंडे विद्यालयाचे यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

अलिबाग नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे (ता. उरण)च्या १९ वर्षे वयोगट मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक व मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

याबद्दल स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपप्राचार्य एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस.एस. पाटील, क्रीडा विभाग प्रमुख केशव पवार, डी.डी. पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## विश्वचषक विजेत्या टीम इंडियातील प्रत्येक खेळाडूला टाटा मोटर्स देणार सिएरा एसयूव्ही गिफ्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक विजयाचे सेलिब्रेशन म्हणून टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्सने मोठी घोषणा केली आहे. संघातील प्रत्येक खेळाडूला लवकरच लॉन्च होणारी नवी सिएरा एसयूव्ही भेट म्हणून देण्यात येईल, अशी घोषणा कंपनीने केली आहे.



२ नोव्हेंबर रोजी झालेल्या महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी मात करून पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला. दीर्घकाळापासून प्रतीक्षेत असलेला हा विजय भारतीय महिला क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही आघाड्यांवर अप्रतिम कामगिरी करत देशाची मान अभिमानाने उंचावली.

या संदर्भात टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स लिमिटेडचे एमडी आणि सीईओ शैलेश चंद्र म्हणाले, भारतीय महिला क्रिकेट संघाने असामान्य प्रदर्शन करत जबरदस्त विजय मिळवून संपूर्ण देशाला अभिमानाची अनुभूती करवून दिली. आम्ही या लिजन्ड्सना एक आणखी लिजन्ड टाटा सिएरा भेट कर आहोत.

कंपनीने स्पष्ट केले की, प्रत्येक खेळाडूला या एसयूव्हीचे टॉप मॉडेल देण्यात येईल. टाटा सिएरा २५ येत्या नोव्हेंबर रोजी लॉन्च होणार असून पहिल्या बॅचमधील कार भारतीय महिला क्रिकेट संघाला दिल्या जाणार आहेत.

## दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत मुंबईची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

यजमान मुंबईने विनय सरोज (नाबाद ५२) आणि मयुरेश संसारे (नाबाद ४८) यांच्या फटकेबाजीच्या जोरावर उत्तर प्रदेशचा सलामीच्या लढतीत नऊ गडी राखून पराभव करीत दणदणीत विजयी सलामी दिली.



मुंबई पोलीस जिमखाना येथे दिव्यांग एलआयसी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशन फॉर द फिजिकली चॅलेंज्ड संघटनेचे अध्यक्ष कर्सन घावरी यांच्या हस्ते झाले.

सलामीच्या सामन्यात टॉस जिंकून मुंबईने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतलेला. मुंबई संघासमोर उत्तर प्रदेशने १५ षटकांत १३० धावांचे लक्ष्य ठेवले. उत्तर प्रदेशचा कर्णधार सुशील शून्यावर बाद झाला, मात्र मनोद यादव (नाबाद ३०) आणि अशोक कुमार (नाबाद ३३) यांनी झुंजार खेळी केली. प्रत्युत्तरादाखल मुंबईने १३.१ षटकात १३४ धावा करीत दणकेबाज विजय मिळविला. प्रत्येकी १५ षटकांच्या ही स्पर्धा असून ४० टक्के शारीरिक दिव्यांग खेळाडूंसाठी आहे.

## जेमिमाने वर्ल्डकपनंतर गावसकरांना करून दिली वचनाची आठवण




मुंबई : प्रतिनिधी

भारतीय महिला संघ वर्ल्ड चॅम्पियन ठरला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनमध्ये टीम इंडियाने ५२ धावांनी मोठा विजय मिळवला. तत्पूर्वी माजी दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावसकरांनी भारत जर वर्ल्डकप जिंकला तर एक गोष्ट करणार असल्याचे वचन दिले होते. आता जेमिमा रॉड्रीग्जने व्हीडिओ शेअर करत ते वचन पूर्ण करण्यासाठी ती तयार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्यापूर्वी सुनील गावसकर यांनी जेमिमा रॉड्रीग्जबरोबर गाणे गाण्याचे वचन दिले होते. सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध वादळी खेळी करणारी जेमिमा तिच्या डान्स आणि गाण्यांसाठी प्रसिद्ध आहे. जर भारतीय महिला संघ फायनल जिंकला, तर ते जेमिमाबरोबर गाणे गात या विजयाचा आनंद साजरा करायला आवडेल, असे म्हणाले होते.

भारताच्या विश्वचषक विजयानंतर जेमिमा रॉड्रिग्जने क्रिकेट दिग्गज सुनील गावसकर यांना अगदी संगीतपूर्ण पद्धतीने त्यांचे वचन पूर्ण करण्याची आठवण करून दिली आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर जेमिमाने इन्स्टाग्रामवर एक मजेशीर व्हिडीओ शेअर करत लिहिले, तुमच्याबरोबर गाणे गाण्यासाठी वाट पाहत आहे.

जेमिमाने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये तिने सुनील गावसकरांना त्यांनी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. जेमिमा म्हणतेय, हॅलो सुनील गावस्कर सर, तुम्ही म्हटले होते की भारतीय संघाने जर विश्वचषक जिंकला तर आपण दोघे एकत्र गाणे गाऊ. मी गिटार घेऊन रेडी आणि तुम्हीही माईक घेऊन तयार असाल. खूप सारे प्रेम आणि खूप खूप आभार! आता जेमिमाच्या या व्हिडीओनंतर ती आणि गावसकर एकत्र गाताना कधी पहायला, ऐकायला मिळणार यावर सर्वांच्या नजरा आहेत.



## आशियाई जिम्नॅस्टिक स्पर्धेत सान्वी शिंदेला रौप्यपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

गोव्यात झालेल्या १४व्या ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक आशियाई स्पर्धेत युवा जिम्नॅस्ट सान्वी विवेक शिंदे हिने चमकदार कामगिरी केली. तिने मिश्र जोडीतील तिचा सहकारी आदित्य दिघे यांच्यासोबत सर्व तीन श्रेणींमध्ये बॅलन्स, डायनॅमिक आणि कंबाइंड रुटीन प्रत्येकी रौप्यपदक पटकावले.

स्पर्धेत कझाकिस्तान, डीपीआर कोरिया, हाँगकाँग, चीनसह आठ देशांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी नागपूर आणि गोवा येथे झालेल्या कॅम्पनंतर सान्वीची निवड झाली होती. आशियाई स्पर्धेत पदक जिंकण्याचा सन्मान आनंददायी आणि अभिमानास्पद असल्याचे सान्वीने माहिती देताना सांगितले.

## वर्ल्डकपनंतर टीम इंडियातील स्टार खेळाडूंच्या ब्रँड व्हॅल्यूत तुफान वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेटपटूंनी वनडे वर्ल्डकप जिंकत इतिहास रचला. गेल्या काही वर्षांपासून टीम इंडियाचे वर्ल्ड चॅम्पियन होणे थोडक्या हुकत होते, मात्र यंदाच्या वनडे वर्ल्डकपमध्ये टीम इंडियाने हा दुष्काळ संपवला. यानंतर टीम इंडियातील स्टार खेळाडूंच्या ब्रँड व्हॅल्यूतदेखील तुफान वाढ झाली आहे.

आता टीम इंडियातील स्टार खेळाडूंकडे जाहिरातींचा ओघदेखील वाढणार आहे. हीच संधी साधून भारतीय महिला क्रिकेट संघातील अनेक खेळाडूंनी आपल्या जाहिरातीची फी वाढवली आहे. त्यांची ब्रँड व्हॅल्यू चांगलीच वाढली आहे. प्राथमिक माहितीनुसार संघातील खेळाडूंची ब्रँड व्हॅल्यू हे २५ ते १०० टक्क्यांपर्यंत वाढली आहे.

इकॉनॉमिक टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार सेमी फायनलमध्ये दमदार शतकी खेळी करणाऱ्या जेमिमाह रॉड्रिग्ज, स्मृती मानधना, हरमनप्रीत कौर, दिप्ती शर्मा, शफाली वर्मा आणि



इतर खेळाडूंच्या सोशल मीडिया अकाऊंटवरील फॉलोअर्सची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यांच्या सोशल मीडिया फॉलोअर्सची संख्या दुप्पट तिप्पट होत आहे. त्याचबरोबर संघातील खेळाडूंना अनेक ब्रँड्सनी त्यांचे प्रमोशन करण्यासाठी विचारणा सुरू केली आहे. या खेळाडूंच्या मॅनेजमेंट एजन्सींकडे जाहिरात करण्याची मागणी अभुतपूर्वरित्या वाढत आहे. अनेक ब्रँड्स तर खेळाडूंसोबत रिनिगोशिएशन करत आहेत. त्यांनी २५ ते ३० टक्के फी वाढवली आहे, असे बेसलाईन व्हेंचर्सचे संचालक तुहीन मिश्रा यांनी सांगितले.

ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या सेमी फायनल सामन्यात १२७ धावांची नाबाद खेळी करणाऱ्या जेमिमाह रॉड्रिग्जची ब्रँड व्हॅल्यू तर १०० टक्क्यांनी वाढली आहे. जेएसडब्लू स्पोर्ट्सचे सीसीओ करन यादव हे जेमिमाहचे ब्रँड मॅनेजमेंट करतात. त्यांनी सांगितले की, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यानंतर जेमिमाहला जाहिरात करण्याबाबतच्या विनंत्यांचा पाऊस पडत आहे. आम्ही सध्या १० ते १२ विविध क्षेत्रातील ब्रँड्ससोबत चर्चा करत आहोत.

मिळालेल्या माहितीनुसार जेमिमाह रॉड्रिग्जच्या ब्रँड एन्डॉसमेंटची रेंज ही ७५ लाख ते १.५ कोटी इतकी असणार आहे. हे दर ब्रँडसोबत किती काळ असोसिएशन असणार आहे यावर ठरणार आहे. दुसरीकडे स्मृती मानधना ही देशातील सर्वात जास्त फी आकारणारी महिला क्रिकेटपटू ठरली आहे. तिच्याकडे सध्या १६ ब्रँड्स आहेत. ती एका ब्रँडच्या प्रमोशनसाठी जवळपास १.५ कोटी ते दोन कोटी रुपये आकारते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com